शनिवार, 9 जुलै 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 304
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 9 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-304 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

चर्चेतली बातमी

## संजय राऊतांच्या अडचणी वाढल्या! अटक वॉरंट जारी



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्या तक्रारीनंतर शिवसेना नेते संजय राऊत याच्या विरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे, त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. राऊत यांनी, मेधा सोमय्या यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते ज्यानंतर त्यांनी अब्रुनुकसानीचा दावा केला होता. याच प्रकरणात संजय राऊत यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. संजय राऊत याच्या अडचणी मागच्या काही दिवसांपासून वाढताना दिसत आहेत, दुसर अरेस्ट वॉरंट कोर्टाने संजय राऊत यांना बजावले आहे. मेधा सोमय्या ज्या भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी आहेत त्यांनी संजय राऊतांनी कुठलाही पुरावा नसताना केलेल्या आरोपांबद्दल गुन्हा दाखल केला होता. मेधा सोमय्या यांनी शिवडी कोर्टामध्ये अब्रुनुकसानीची केस केली होती. कोर्टाने तिन दिवसांपूर्वी बेलेबल वॉरंट जारी करण्यात आले होते.

# धनुष्यबाण हिरावू शकत नाही

## उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांना दिला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीवर पत्रकार परिषद घेत जनतेशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी शिंदे गटाची बंडखोरी, शिवसेना, धनुष्यबाण आणि त्यांना झालेला त्रास या सगळ्यावर त्यांनी आपली मतं मांडली. आषाढी एकादशी दोन दिवसांवर आली आहे. आषाढीला पंढरपूरला येण्याचे वारकऱ्यांचे निमंत्रण मला आले. पण मी पांडूरंगाच्या दर्शनासाठी नंतर जाणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, सध्या धनुष्यबाण कोणाकडे जाणार? यावर राजकीय चर्चा रंगली असताना त्यावरही उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट उत्तर दिले आहे.**

उद्धव ठाकरे म्हणाले, कालपासून मी अनेक शिवसैनिकांशी संवाद साधतो आहे. सगळ्यांच्या भावना दाटून आल्या आहेत. लोकांवरील दडपण हलके करणे माझे काम आहे. शिवसैनिकांवर दडपण वाढेल असे मी बोलणार नाही. पण कालच्या भेटीगाठीतील चर्चेतून शिवसेनेच्या चिन्हाबद्दल चर्चा सुरु आहे. कायद्यानुसार धनुष्यबाण शिवसेनेकडून कोणीही हिरावून घेत नाही. चिन्हाबाबतची चिंता सोडा. लोक धनुष्यबाणचे नव्हे तर उमेदवारही पाहतात. काल मी शिवसैनिकांना गेल्या काळात काय काय झाले होते ते काल सांगत होतो. त्यामुळे त्याचा अर्थ असा होत नाही की आमचे चिन्ह जाणार आहे.
दुसरे म्हणजे फोटो येत आहेत की एवढे नगरसेवक गेले तेवढे नगरसेवक गेले पण असे नाही. कारण सध्या महापालिका अस्तित्वात नाहीत. त्यामुळे म्हटले तर हे त्यांचे व्यक्तिगत कार्यकर्ते असतील, ज्यांना आम्ही



निष्ठावंत म्हणून उमेदवारी दिली होती, ते गेले असतील. शिवसेनाभवनात साधेसाधे शिवसैनिक येत होते. कालपरवापर्यंत शिवसेनाभवनात राज्यातील शिवसैनिक महिला आल्या होत्या आणि त्या वाघिणीप्रमाणे बोलत होत्या. तळहातावर पोट असणारी साधी लोकं येत आहेत आणि रडत आहेत. शिवसेनेने साध्या व्यक्तींना मोठे केले. पण जी मोठी झाली ती गेली. पण मोठ्या मनाची ही साधी माणसे जोपर्यंत सोबत आहेत तोपर्यंत शिवसेनेच्या भवितव्याला धोका पोहोचू शकत नाही.

### विधीमंडळ पक्ष आणि नोंदणीकृत पक्ष वेगळा असतो

म्हणून मुद्दा येतो की, शिवसेना कोणाची? शिवसेना ही आहे ती आहेच. त्यामुळे शिवसेना पळवून नेण्याची गोष्ट नाही. एक फरक आहे की विधीमंडळ पक्ष हा वेगळा असतो आणि नोंदणीकृत पक्ष वेगळा असतो. कारण पक्षातून आमदार गेले तरी पक्ष टिकून राहतो. नोंदणीकृत पक्षात असंख्य लोक असतात. आमचाही एकच आमदार होता, तेच पक्ष सोडून गेले म्हणजे पक्ष संपला का? त्यामुळे धनुष्यबाण या चिन्हाबद्दल कोणताही संभ्रम मनात ठेवू नका, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी यावेळी केले.

चर्चेतली बातमी

## मुख्यमंत्री रेड्डींना धक्का; आईचा वायएसआर काँग्रेसला रामराम



आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या आई आणि वायएसआर काँग्रेस नेत्या वायएस विजयम्मा यांनी पक्षाच्या मानद अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाच्या राष्ट्रीय बैठकीत वायएस विजयम्मा म्हणाल्या की, मी या पक्षापासून वेगळा होण्याचा विचार करत आहे. त्यांनी आता मुलगी शर्मिला यांच्या तेलंगाणातील पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या बैठकीत विजयम्मा यांनी आता यापुढे मुलीच्या पक्षाला पाठिंबा देण्याचे वक्तव्य केले त्या म्हणाल्या की, शर्मिला एकटी लढत आहे. राजशेखर रेड्डी यांची पत्नी आणि शर्मिलाची आई या नात्याने मला तिच्या पाठीशी उभे राहावे लागेल, असे माझे मन मला सांगत आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वायएस जगनमोहन रेड्डी यांच्या आई वायएस विजयम्मा यांनी शुक्रवारी त्यांची मुलगी शर्मिला यांच्या पक्षात सामील होण्यासाठी मानद अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

# उत्तराखंडमध्ये पर्यटकांची कार नदीत वाहून गेली

आधुनिक केसरी न्यूज

**डेहराडून :** उत्तराखंडच्या रामनगर येथे शुक्रवारी मोठी दुर्घटना घडली. येथील ढेला नदीत पर्यटकांची कार वाहून गेली. या अपघातात 9 पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. सुदैवाने एका मुलीचा जीव वाचवण्यात बचाव पथकाला यश आले. अपघातातील सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व पर्यटक पंजाबचे होते.
समोर आलेल्या माहितीनुसार, मुसळधार पावसानंतर ढेला नदीच्या पाणी पातळीत लक्षणीय वाढ झाली होती. हे पाणी पुलाच्या वरपर्यंत चढले होते. यादरम्यान तेथून जाणाऱ्या पर्यटकांनी भर पाण्यातून पूल ओलांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, गाडी पुलावरुन नदीत कोसळली आणि नदीच्या जोरदार प्रवाहाने वाहून गेली.
पंजाबचे 11 पर्यटक अर्टिगा कारमधून उत्तराखंडमधील पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी आले होते. दरम्यान, पहाटे पाच वाजता त्यांची गाडी रामनगर येथील ढेली नदीजवळ आली. नदीचे पाणी पुलावरून वाहत होते. असे असतानाही चालकाने वाहनाचा वेग वाढवला आणि भरधाव वेगात पूल ओलांडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाण्याचा जोर इतका होता की कार नदीत वाहून गेली. अपघातानंतर स्थानिकांनी या घटनेची माहिती प्रशासनाला दिली. त्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. घटनास्थळापासून काही अंतरावर 9 जणांचे मृतदेह आढळून आले.

## महाराष्ट्र-गोव्यासह अनेक राज्यात मुसळधार



**नवी दिल्ली :** भारतीय हवामान खात्याने येत्या पाच दिवसांत मुंबई आणि गोव्यासह इतर अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. भारतीय हवामान खात्याने हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, ओडिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांमध्ये शनिवार-रविवार मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**महाराष्ट्रात रेड अलर्ट**

महाराष्ट्रात सलग 4 दिवसांपासून पाऊस पडत आहे. भारतीय हवामान खात्याने आता मुंबई आणि गोव्यात पुढील 24 तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. महाराष्ट्रात 10 जुलैपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यादरम्यान लोकांना समुद्रकिनाऱ्यावर जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

**गुजरातेत मुसळधार**

भारतीय हवामान खात्याच्या अलर्टनुसार गुजरातमध्ये 11 जुलैपर्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्याच्या काही भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये नवसारी, वलसाड, दमण, दादर नगर हवेली, सौराष्ट्र आणि कच्छमधील जामनगर, जुनागढ, देवभूमी द्वारका आणि दक्षिण गुजरातमधील कच्छ जिल्ह्यांचा समावेश आहे, जेथे मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. मात्र, गुजरातमधील काही भागात आधीच पाऊस सुरू आहे. जुनागडच्या पावसानंतर पाणी साचल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

# शिंदेंना असे अमृत पाजले की त्यांची गाडी कुठेही थांबणार नाही : गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात एकनाथ शिंदे गट आणि भाजपाने संयुक्तपणे राज्यात सत्ता स्थापन केली आहे. सत्तांतरानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी घेतली आहे. या सत्ताबदलानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे काम आणि राज्याच्या प्रगतीवर भाष्य केले आहे. एकनाथ शिंदे यांना असे अमृत पाजले आहे की, मला वाटते राज्याच्या विकासाची यात्रा बुलेट ट्रेनपेक्षाही वेगने पुढे जाईल, असे गडकरी म्हणाले आहेत. मुंबईत आयोजित केलेल्या आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत आयोजित केलेल्या संकल्प ते सिध्दी (नवा भारत, नवे संकल्प) परिषदेत बोलत होते.
एकनाथ शिंदे आणि देवेंद्र पडणवीस यांचा आज हा पहिलाच कार्यक्रम होता. आम्ही त्यांना असे अमृत पाजले आहे, की मला वाटते त्यांची गाडी आता थांबणार नाही. आता महाराष्ट्राच्या विकासाची यात्रा बुलेट ट्रेनपेक्षा जास्त वेगाने पुढे जाईल, असे गडकरी म्हणाले आहेत. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. कार्यक्रमात पुढे बोलताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, महाराष्ट्र हे देशाचे विकास इंजिन आहे. देशाला पाच ट्रिलीअन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे स्वप्न मुंबई आणि महाराष्ट्राशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. महाराष्ट्राने कायमच देशाच्या आर्थिक विकासात महत्वाचे योगदान दिले आहे. सेवा, कृषी, आरोग्य अशा क्षेत्रात महाराष्ट्राने उत्कृष्ट काम केले असून महाराष्ट्रात येणाऱ्या काळात बांधण्यात येणारे रस्ते, रोप वे यामुळे अधिकच्या पायाभूत सुविधा निर्माण होण्यास मदत होणार आहे.


# चीनने भारताला पुन्हा डिवचले

आधुनिक केसरी न्यूज



**लडाख :** भारत-चीनदरम्यान अद्यापही तणावाचे ढग दूर झालेले नाहीत. अधुनमधून चीनला भारताला डिवचण्याची खुमखुमी होतच असते. आता पुन्हा एकदा याची पुनरावृत्ती पहायला मिळाली. चीनच्या लष्कराचे एक विमान लडाखजवळील ॲक्च्युअल लाईन ऑफ कन्ट्रोलच्या जवळ घिरट्या घालत असल्याचे दिसून आले आहे. याची गंभीर दखल भारतीय हवाई दलाने घेतली असून थेट चीनी एअरफोर्सकडे तक्रार केली आहे.
गेल्या काही महिन्यात चीनने यापूर्वी अशा प्रकारे अनेकदा भारतीय हवाई हद्दीचे उल्लंघन केले आहे. पूर्व लडाखमध्ये चीनच्या बाजूने चीनने आपली टेहळणी विमान उडवली आहेत. यावेळी भारतीय हवाई दलाच्या रडारवर सीमेवर घिरट्या घालणारे हे चीनी विमान दिसून आले. पूर्व लडाखमधील सीमा भागात चीनी हवाई दलाकडून महत्वाचा युद्ध सराव कार्यक्रम घेण्यात आला. या ड्रिलदरम्यान हा प्रकार घडला असून यावेळी चीनने डिफेन्स उपकरणांचा वापर केला. दरम्यान, या प्रकाराची भारताने गंभीर दखल घेतली असून चीनला अशा घटना भविष्यात पुन्हा होऊ नयेत याबाबत काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कारण यापूर्वी सन २०२० मध्ये लडाखच्या गलवान व्हॅलीमध्ये भारतीय आणि चीनी सैनिकांमध्ये मोठा संघर्ष झाला होता. यामध्ये चीनचे ४० तर भारताचे २० सैनिक मारले गेले होते.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# एक सोहळा : आगळावेगळा...

आधुनिक केसरी

चि स्वराज जेव्हा आठ वर्षांचा झाला, तेव्हा सारिकाला साहजिकच असे वाटले की आपल्या या मुलावर उपनयन संस्कार व्हावा. खरे तर पूर्वी समाजातील सर्वच वर्गात मुलांचा उपनयन विधी किंवा संस्कार केला जात असे दाखले सापडतात. उपनयन संस्कार झाल्यानंतर मुलगा गुरुगृही शिक्षणासाठी जात असे. केवळ मुलांवरच उपनयन संस्कार होत नव्हता तर मुलींवर देखील हा संस्कार केला जात असे. मुलींना देखील सर्व शिक्षण दिले जात असे. पण काळाच्या ओघात काही चांगल्या गोष्टी मागे पडल्या. उपनयन संस्कार हा ब्राह्मण समाजातील मुलांपुरताच मर्यादित राहिला आणि मुलींबद्दल तर बोलायलाच नको. मुलींचा व्रतबंध तर दूरच पण त्यांना शिकवण्याची देखील समाजाची मानसिकता राहिली नव्हती. चूल आणि मूल हेच जणू तिचे कार्यक्षेत्र असे समाजाने ठरवून टाकले होते. अशा परिस्थितीत महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, आगरकर यांच्यासारख्या थोर समाजसेवकांमुळे मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळाला.

सारिकाने जेव्हा चि स्वराजवर उपनयन संस्कार व्हावा अशी कल्पना तिच्या यजमानांजवळ मांडली तेव्हा त्यांनी त्यासाठी त्वरित सहमती दर्शवली. आता प्रश्न होता घरातील माणसांचा म्हणजे तिच्या सासू सासऱ्यांचा. त्यांना ही कल्पना कितपत पसंत पडते अशी शंका होती. पण ही सगळीच मंडळी सुधारित विचारांची आणि मोठया मनाची. त्यांनीही त्वरित होकार दिला. आणि हा उपनयन सोहळा प्रत्यक्षात येऊ शकला. या सोहळ्याचे पौरोहित्य करण्यासाठी श्री जांभेकर गुरुजी यांनी आनंदाने आणि त्वरित होकार दर्शवला. त्यांनी या सोहळ्याचे विधिवत पौरोहित्य करून त्यातील प्रत्येक गोष्टीचे महत्व सर्वांना समजेल अशा पद्धतीने सांगितले. हा सगळाच कार्यक्रम अगदी दृष्ट लागावी इतका देखणा झाला. या सोहळ्याला सारिकाच्या सासरकडील जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी आणि आमच्याकडील सर्व नातेवाईक मंडळी आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होती. या अर्थाने हा सोहळा आगळावेगळा.

या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांना उपनयन विधी करण्यासाठी तत्कालीन कर्मठ ब्रह्मवृंदांनी दिलेला नकार, **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# जीवनात बौद्धिक उद्दिष्ट विकसित व्हावीत

आधुनिक केसरी

शिक्षणाच्या उपयोगातून अधिकार, कायदे आणि नियम जाणून घेऊन आणि त्यांचा आदर करून आम्ही जगण्यासाठी एक चांगला समाज घडवू शकतो. नैतिक शिक्षणाची व्याख्या लहान मुलांना आणि तरुणांना योग्य तसेच अयोग्य याविषयी काही समज आणि मूल्ये आत्मसात करण्यात मदत करणे अशी केली जाऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शिक्षणाचा आपला हेतू, दृष्टीकोन आणि इतरांबद्दल तसेच त्यांच्या वातावरणाबद्दलच्या वागणुकीचे मार्गदर्शन करतो. म्हणूनच माणसाच्या जीवनात शिक्षण महत्त्वाचे असते. अशिक्षित लोकांच्या तुलनेत सुशिक्षित लोक स्पर्धात्मक जगात अधिक अचूकपणे टिकून राहू शकतात. व्हॅल्यू एज्युकेशन अर्थातच मूल्य शिक्षण आपल्याला जगण्याच्या चांगल्या संधी आणि चांगले काम देत असते. जग बदलण्यासाठी शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे. आज आपण त्याची पडताळणी करू शकतो. आपण ज्या जगामध्ये राहतो ते शिक्षण आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास अनुमती देते. शिक्षणाच्या माध्यमातून आपण आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबद्दल विचारशील होऊ शकतो.

स्वयं-वास्तविकीकरण किंवा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करणे आणि अद्वितीय प्रतिभा तसेच स्वारस्ये विकसित करणे हे मूल्य शिक्षणामुळे शक्य होऊ शकते. विशेषतः विकसनशील दृष्टीकोनाच्या क्षेत्रात जग कसे कार्य करते आणि त्यातील लोक कसे संवाद साधतात हे समजून घेणे आवश्यक असते. चारित्र्य, नैतिकता, व्यक्ती, समुदाय, नागरी अभ्यास आणि सांस्कृतिक अभ्यास, नैतिक शिक्षण शिकवणे आणि शिकणे यामध्ये ह्या सर्व स्तंभांचा समावेश होत असतो. बौद्धिक उद्दिष्ट देखील विकसित होत असतात उदा. ज्ञान, विचार, तर्क, निर्णय आणि सामान्यीकरण प्राप्त करण्यासाठी ते आवश्यक असते.



आधुनिक केसरी

## रीती चंद्रभागा | खळाळू दे ||

सोसावा कसा | अंतरीचा कड ||
कुणाला सवड | नाही येथे ||१||

जगणेच झाले | शाप येथे आता ||
श्वासाचा पत्ता | गवसेना ||२||

भेगाळली धरा | आळवी आभाळा ||
दाटेना उमाळा | पावसाला ||३||

जनी मनी ध्यानी | वासना मातली ||
लेक थरारली | कलयुगी ||४||

मरणासाठी ही | याचना करतो ||
जगुनी मरतो | कोणी येथे ||५||

वेदनेची आता | पालखी चालली ||
भोयांची सावली | व्याकुळली ||६||

सोड वीट आता | जरा पांडुरंगा ||
रीती चंद्रभागा | खळाळू दे ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**स्थाल्यां वैदूर्यमय्या पचति तिलकणां**
**श्चान्दनैरिन्धनौघैः**
**सौवर्णैर्लाङ्गलाग्रैर्विलिखति वसुधा**
**मर्कमूल्यस्य हेतोः ।**
**कृत्वा कर्पूरखण्डान् वृतिमिह कुरूते**
**कोद्रवाणां समन्तात्**
**प्राप्येमां कर्मभूमिं न चरति मनुजो**
**यस्तपो मन्दभाग्यः ।।**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अर्थ :** कोणी वैदुर्य मण्याने सजलेल्या थाळीत, चंदनास इंधन बनवून, तीळ शिजवत आहे, अर्कमूळासाठी कोणी सोन्याचे फाळ असणा-या नांगराने वसुधेला नांगरीत आहे, कापूर वृक्षाला खंडित करून कोणी कोदवृक्षाच्या सभोवती कुंपण तयार करत आहे, तर ती मूर्खताच म्हटली पाहिजे. अशाच प्रकारे, कर्मभूमीस प्राप्त होऊन कोणी तपस्या अर्थात सत्कर्म करीत नसेल, तर त्यास अभागीच म्हटले गेले पाहिजे. माणसाला पूर्व कर्मांचे परिणाम भोगावे लागतात तसेच माणूस नवीन चांगली कर्म देखील करू शकतो, असे मानले जाते. या लोकात आपण सत्कर्म केले पाहिजेत, असा आशय येथे सम्राट भर्तृहरींनी अभिव्यक्त केला आहे.

# ।। दासबोध स्तवन ।।



## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

**कालगणना**

1) कृतयुग-- सतरा लाख अठ्ठावीस हजार वर्षे.
2)त्रेतायुग --बारालाख शहाण्णव हजार वर्षे.
3)द्वापारयुग--आठलाख चौसष्ठ हजार वर्षे.
4)कलीयुग-- चार लाख बत्तीस हजार वर्षे.चार युगांची मिळून त्रेचाळीस लाख बत्तीस हजार वर्षे होतात. अशी चार युगं म्हणजे ब्रम्हदेवाचा एक दिवस होतो. ब्रम्हदेवाचे असे हजार दिवस झाले की विष्णू ची एक घटीका होते. विष्णूच्या हजार घटका झाल्या म्हणजे महादेवाचे एक पळ होते. देवाधिदेव महादेवाचे एक हजार पळ झाले म्हणजे आदिशक्ती महामायेचे म्हणजेच मूळ मायेचे एक अर्धपळ होते. दासबोधाच्या मूळ ग्रंथात अशा कालगणनेवर विस्तृत माहिती दिली आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपल्या सारख्या सामान्य माणसाला त्या समजण्यास अवघड आहेत। पण अभ्यासकांना त्या खूपच प्रेरणादायी आहेत. आदिशक्तीसारख्या अनंत शक्ति आहेत. अनंत ब्रम्हाडांच्या रचना होतात व जातात. पण परब्रह्म मात्र आहे तसेच रहाते. त्यात काहीच बदल होत नाही. खरंतर परब्रम्हाला स्थिती ,ताल,लय,ऊत्पती काही नाही. वेद आणि श्रुति"नेती,नेति म्हणजे असे नाही, असे नाही. परब्रम्हाची स्थिती खंडत नाही, ती सदैव अखंडीत असते. परब्रम्हाचें वर्णन करता येत नाही मग त्याची स्थिती कोण व कशी सांगणार!

कलीयुगाची चार हजार सातशें साठ वर्षे पूर्ण झाली. जी वर्षे उरली आहेत ती कशी ते पहा! शके 1581साली हा आता आपण अभ्यास करतो त्या सहाव्या दशकातील चौथ्या समासाची निर्मिती झाली तर आजच्या घटकेला ती किती वर्षे झाली याचे अवघड गणित करावे लागेल. कलीयुगाची 4लाख,27,240 वर्षे अद्यापही शिल्लक आहेत. खुपच व्यापक व चिंतनशील विषय आहे. या विनाशी विश्वरचनेमध्ये एकापेक्षा एक गुढ व चिंतनशील विषय आहेत. दासबोध अभ्यासकांना तर ती एक प्रकारची पर्वणीच आहे. असे हे चराचर विश्व ब्रम्हांडनायकाने रचलेले आहे. कोणी म्हणतो विश्वामध्ये विष्णू मोठा आहे तर कोणी म्हणतो शंकर मोठा आहे **(क्रमशः)**

# रंग वारीचे

आधुनिक केसरी

गंगाखेड जवळच्या भेंडेवाडी या छोट्या गावात सरूबाई आपल्या कुटुंबाबरोबर राहणारी सत्तरीतली आजी. दरवर्षी आषाढी वारीला घरागणिक दोन-तीन माणसं निघायची. सरूबाई आणि लिंबाजी हे जोडपे पण त्यात असायचं. एकदम साधी राहणी, धार्मिक, देवभोळी, शुद्ध सात्विक वागणं असणारी जोडी. गावातले सगळे मिळून जवळपास पस्तीस ते चाळीस जण वारीत असायचे. ह्या वर्षी, दोन वर्षांनी वारीला जाता येणार म्हणून सगळेच आनंदात होते. मायबाप विठू माउलीचे दर्शन घेता येणार म्हणून सगळेच तयारीला लागले. एक सामान ठेवण्यासाठी टेम्पो सगळ्यांनी वर्गणी काढून ठरवला होता. रोजचं लागणार मोजकंच सामान सर्वांनी घ्यावे. शिवाय रोजच्या जेवणाची सोय होईल एवढं आवश्यक साहित्य आणि कुणाला काही त्रास झाला तर त्याला जागा राहावी हा त्यामागचा उद्देश.

पुरूष मंडळी व बायाबापड्यांनी कामे वाटून घेतली, मुक्काम ठरले, रोज किती अंतर चालायचं, कुणी तुळशी वृंदावन डोक्यावर, तर कुणी भरली कळशी, कुणी पखवाज वाजवायचा, कुणी टाळ वाजवायचे सगळं सगळं काही ठरलं. यंदा दिंडीत पस्तीसच्या ऐवजी पन्नास साठ जण तयार होते त्यामुळेच नेहमीपेक्षा जास्त नियोजन करावे लागत होते. निघायची तारिख, वार,वेळ ठरली.

अंगद, रामाजी, महादेव, गोविंद, पांडुरंग, सदाशिव नारायण, शारदाबाई, शशिकलाबाई, सगुणाबाई, चंद्रकलाबाई, कमळाबाई, संगिता, गोदावरीबाई अशी बरीच मंडळी निघाली. बरेच नेहमीचे, नवखे, हौशी, कुणी वारी बघायला, तर कुणी वारी अनुभवायला, तर कोणी वारी पोहचती करायला. पण सगळ्यांची एकच तिव्र इच्छा, ओढ पांडुरंगाच्या दर्शनाचीच ! दिंडीत कुणी सुंदर टाळ वाजवीत असे तर कुणी खड्या आवाजात भजन म्हणत होता. हळूहळू दिंडी मार्गक्रमण करत होती. गोविंद आणि त्याची बायको संगिता सुंदर भारूड सादर करत. भारूडाने चालण्याचा शीण कुठल्या कुठे पळून जायचा. लिंबाजीचा आवाज पहाडी पण मधुर होता. सदाशिव पखवाज उत्तम वाजवायचा. बायका ओव्या म्हणत दिंडी पुढे-पुढे जायची. मुक्कामाचे ठिकाणी पोहोचल्या की स्वयंपाकाची तयारी, सगळा स्वयंपाक, भांडी घासणे सगळी कामं मिळून करायच्या. मुक्कामाच्या ठिकाणी लिंबाजी आपल्या पहाडी आवाजात सुंदर भजन सादर करायचे.

मजल दर मजल करत दिंडी आषाढ शुद्ध अष्टमीदिवशी पंढरपूरात पोहचली. सगळ्यांना खूप खूप आनंद झाला.तो त्यांच्या चेहऱ्यावर मावत नव्हता. "आनंद पोटात माझ्या माईना !" अशीच नव्याने आलेल्या वारकऱ्यांची होती. आता सगळे जण फक्त आपल्या लाडक्या विठूरायाच्या दर्शनाची आसुसलेले होते. कधी एकदा आपण मायबापची भेट होईल याची वाट बघत दर्शनबारीमध्ये लागले. दर्शनाची रांग पंढरपूरपासुन सात आठ किलोमीटर अंतरावर पोहचली होती. सगळ्यांना चिंता वाटत होती. आपलं दर्शन कसे होईल? नवमी दिवशी रांगेत लागलेली मंडळी हळूहळू पांडुरंगाच्या देवळात तरटीद्वाराजवळ पोहचले.. नेमके दार बंद झाले. देवा अजून किती वाट पाहायला लावणार! सगळे जण रडायच्या घाईला आले होते. तेवढ्यात दोन माणसे बहुधा मंदिर समितीची असावीत त्यांनी चौकशी सुरू केली. सध्या दर्शनबारीमध्ये वयस्कर व्यक्ती ती पण जोडीनं आलेली आहे याची चौकशी करत होते. " मावशी एकट्याच आल्या का? " नाही जी मालकांबरुबर आले असं सरूबाई म्हणाल्या. खरं तर मनातून खूप घाबरल्या होत्या.

एकादशी दिवशी सरकारी पुजा साधारण रात्री अडीच वाजता असते. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुजा संपन्न होते. त्यांच्या सोबत मायबापाची पुजा करण्याचा मान मिळाला होता. ते जोडपं होतं. भेंडेवाडीच्या दिंडीतील सगळ्यात वयस्कर जोडपं लिंबाजी आणि सरूबाई !

**-सौ आरती राजाराम परिचारक, पंढरपूर**

भेटी लागी जीवा... भाग : 5



## वारी चैतन्याची दोरी... वारी ऊर्जेची शिदोरी...

आधुनिक केसरी

पंढरीत जाऊन चंद्रभागा नदीत स्नान करुन विठोबाचे दर्शन ही एकच इच्छा वारकऱ्याची मनात असते.पंढरीशी जारे आल्यानो संसारा। दिनाचा सोयरा पांडुरंग।। याच भक्तीपोटी वारकरी वारी चुकवत नाहीत, पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदी हरी।। अशी भागवत संप्रदायाची ठाम धारणा आहे. एकादशीला चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेणे याने प्राप्त होणारे आध्यात्मिक सुखाचे वर्णन शब्दात मांडणे अवघडच आहे. लौकिक आणि अलौकिक यापैकी कोणतं सुख आपल्याला हवं हे कळलं की माणूस वारीला जातो. जे संसारात मिळत ते लौकिक आणि जे परमार्थात मिळत ते अलौकिक सुख. मुळात परमार्थ हाच अनेकांना रुचत नाही तर अनेकांना कळतंच नाही. आता हे 'न रुचनं' आणि 'न कळणं' ह्या दोन्ही संकल्पना आपल्या आयुष्यातून काढून टाकायच्या असतील तर वारीला जावं. मुळात देवाने आपल्याला काहीतरी द्यावे असा मुख्य हेतू हा वारकऱ्यांचा कधीच नसतो.



ह.भ.प.अजबराव मिरगे

हेचि दान देगा देवा ।
तुझा विसर न व्हावा ।।

एवढंच वारकरी विठ्ठलाकडे मागत असतो. हीच त्यांची विठ्ठलभक्ती असते. वारी हा मुळात प्रेमसोहळा आहे. जिथे व्यवहार संपतो तिथून प्रेम सुरू होत. प्रेमात व्यवहार असता कामा नये. मुळात व्यवहारी प्रेम असूच शकत नाही. काही जण वारीला रिकामटेकड्यांचे उद्योग म्हणतात. यात त्यांची चूक आहे असं आम्ही म्हणणार नाही कारण त्यांना प्रेम हे कळलेलं नाही. त्यांना लौकिक आणि अलौकीक सुख म्हणजे काय हे समजलेलं नाही. काम करून पैसा मिळवल्याने सुख मिळते अशा ज्याच्या भ्रामक समजुती आहेत, त्यांना वारीचे महत्व हे कधीच समजणार नाही.

वारीला का जावं.......?

एका वाक्यात सांगायचं झालं तर, 'मी'पणा गळून जाण्याचा सोहळा म्हणजे वारी.. आणि 'मी'पणा गळून जायचा असेल तर वारीला जावं.

वारीमध्ये कोणीही मोठा नसतो आणि कोणीही लहान नसतो. यारे यारे लहान थोर।याती भलते नारी नर।। सगळ्या समाजाचे, जातीपातीचे सगळे पाश तोडून एकत्र करणार शास्वत व्यासपीठ म्हणजे वारी. वारीमध्ये सगळे एकमेकांना माऊली असं संबोधतात. प्रत्येक जण एकमेकांचे चरण स्पर्श करतो. पंढरीच्या लोका नाही अभिमान।पाया पडे जन एकमेका।। समोरचा लहान आहे, गरीब आहे, मळका आहे हे काहीच पाहिलं जात नाही. कारण प्रत्येक वारकऱ्याची हीच भावना असते की, समोर जो आहे तो माझा पांडुरंग आहे. एवढं एकतेचं प्रदर्शन करणारी वारी हा रिकामटेकड्यांचा उद्योग नक्कीच असू शकत नाही.वर्षभराचा ताणतणाव क्षीण वर्षातील एका वारीमुळे नाहीसा होतो,वर्षभर आयुष्यात वारकर्यांना जीवन जगण्यात जो संघर्ष करावा लागतो त्या संघर्षाचा सामना करण्यासाठी वारी एक उर्जोस्रोताचे काम करते....!!!हरीनामात तलीन होऊन वारकरी आपला क्षीणभाग विसरून जातो आणि ज्ञानोबा माऊली तुकाराम।। चा गजर करत वारीतुन सकारात्मक उर्जा घेऊन सकारात्मक होतो हेच वारीचे सर्वांत महत्वाचे अंग असुन वारकरी जो शेतकरी असतो तो या उर्जेला घेऊन वर्षभर आपल्या कामात उपयोग करत असतो वारकरी पंथ आणि महाराष्ट्र.....!!!!

"ज्या प्रदेशातील लोक वारी करतात, त्या प्रदेशाला महाराष्ट्र म्हणतात" अशी महाराष्ट्राची व्याख्या इरावती कर्वे करतात. वारीने महाराष्ट्राला सामाजिक अधिष्ठान दिलं. वारीने महाराष्ट्राला पुरोगामीत्व दिलं. वारी आणि वारकरी पंथ ही आज महाराष्ट्राची ओळख आहे. अनेक राज्यातून आणि अनेक देशांतून वारी अनुभवायला लोक दरवर्षी महाराष्ट्रात येत असतात. महाराष्ट्रातील शेतकरी हा वारकरी असतो. आषाढ महिना तसा कामाचा महिना. ह्याच महिन्यात पाऊस सुरू झालेला असतो, शेतकऱ्यांना पेरण्या करायच्या असतात, अस असतानाही महाराष्ट्रातील शेतकरी हा वारीला जातोच. ह्याचे महत्वाच कारण म्हणजे वारकरी आणि महाराष्ट्र याचं अलौकीक नातं.

वारकरी आणि वारी हा चालू असलेला प्रवास असाच अवरित चंद्रसूर्य असेपर्यंत चालू राहील यात तिळमात्रही शंका नाही.... कारण विठ्ठल माझा मी विठ्ठलाचा ही भावना प्रत्येक वारकर्यांच्या मनात प्रजोल्वीत झाली असुन वारकरी हीच ओळख आपल्या महाराष्टाची झाली आहे.

माझ्या तमाम वारकर्यांना शतशतप्रनाम दंडवत आणि आषाढी वारीच्या मनस्वी शुभेच्छा.... विठुरायाचरणी एकच प्रार्थना विठुराया तुझ्या वारकर्यांना आयुष्यात आनंद सुख आणि समाधान तु देत आला आहेस ते असेच देत रहा.....

।। रामकृष्ण हरी।।

**शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड औरंगाबाद**

# 92 नगरपालिकांसाठी निवडणुकांची तारीख ठरली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांचा बिगुल अखेर वाजला आहे. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर काही दिवसांतच निवडणुकांच्या घोषणेचा कार्यक्रमही निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील पर्जन्यमान कमी असलेल्या 17 जिल्ह्यातील 92 नगरपालिका व चार नगरपंचायतींच्या निवडणुकींचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने आज जाहिर केला. 18 ऑगस्ट रोजी मतदान होणार असून या निवडणूकीची प्रक्रीया 20 जुलैपासून सुरु होणार आहे.

महराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार 20 जून रोजी जिल्हाधिकारी निवडणूक कार्यक्रम जाहिर करणार असून लगेच 22 ते 28 जुलैपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या संकेतस्थळावर नामनिर्देशनपत्र भरायची आहेत. छाननी व वैध नामनिर्देशन पत्र असलेल्या उमेदवारांची यादी 29 जुलै रोजी जाहिर केली जाणार असून 4 ऑगस्ट पर्यंत अर्ज माघारी घेता येणार आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी अंतिम यादी प्रसिध्द केली जाणार आहे. दरम्यान, जेथे आवश्यकता भासेल त्या ठिकाणी 18 ऑगस्ट रोजी मतदान घेतले जाणार आहे. लगेच दुस-या दिवशी म्हणजे 19 ऑगस्ट रोजी मतमोजणी करुन निकाल जाहिर केले जाणार आहेत.

**'अ' वर्गातील नगरपरिषदा**

भुसावळ (जि. जळगाव), बारामती (जि. पुणे), बार्शी (जि. सोलापूर), जालना (जि. जालना), बीड (जि. बीड), उस्मानाबाद (जि. उस्मानाबाद)

**'ब' बर्गातील नगरपरिषदा**

नाशिक जिल्हा - मनमाड, सिन्नर, येवला, धुळे जिल्हा - दोंडाईचा-वरवाडे, शिरपूर-वरवाडे, नंदुरबार जिल्हा - शहादा, जळगाव जिल्हा - अमळनेर, चाळीसगाव, अहमदनगर जिल्हा - संगमनेर, कोपरगाव, श्रीरामपूर, पुणे जिल्हा - चाकण, दौंड, सातारा जिल्हा - कराड, फलटण, सांगली जिल्हा - इस्लामपूर, विटा, सोलापूर जिल्हा - अक्कलकोट, पंढरपूर, अकलूज (नवनिर्मित), कोल्हापूर जिल्हा - जयसिंगपूर, औरंगाबाद जिल्हा - कन्नड, पैठण, बीड जिल्हा - अंबेजोगाई, माजलगाव, परळी-वैजनाथ, लातूर जिल्हा - अहमदपूर, अमरावती जिल्हा - अंजनगाव-सुर्जी.

**'क' बर्गातील नगरपरिषदा**

नाशिक जिल्हा - चांदवड, नांदगाव, सटाणा, भगूर, जळगाव जिल्हा - वरणगाव, धरणगाव, एरंडोल, फैजपूर, पारोळा, यावल, अहमदनगर जिल्हा - जामखेड, शेवगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, राहता, राहुरी, पुणे जिल्हा - राजगुरूनगर, आळंदी, इंदापूर, जेजुरी, सासवड, शिरुर, सातारा जिल्हा - म्हसवड, रहिमतपूर, वाई, सांगली जिल्हा - आष्टा, तासगाव, पलूस, सोलापूर जिल्हा - मोहोळ, दुधनी, करमाळा, कुर्डुवाडी, मेंदगी, मंगळवेढा, सांगोला, कोल्हापूर जिल्हा - गडहिंग्लज, कागल, कुरुंदवाड, मुरगूड, वडगाव, औरंगाबाद जिल्हा - गंगापूर, खुल्ताबाद, जालना जिल्हा - अंबड, भोकरदन, परतूर, बीड जिल्हा - गेवराई, किल्ले धारुर, उस्मानाबाद जिल्हा - भूम, कळंब, मुरुम, नळदुर्ग, उमरगा, परंडा, तुळजापूर, लातूर जिल्हा - औसा, निलंगा, अमरावती जिल्हा - दर्यापूर, बुलडाणा जिल्हा - देऊळगाव राजा.

## योग्यवेळी बाळासाहेबांनी मला माफ केले, मी देखील प्रेमाने त्यांच्याजवळ गेलो : छगन भुजबळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत एकनाथ शिंदे समर्थक आमदारांकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना उत्तर दिली. छगन भुजबळ यांनी आज शिवसेनेत शिवसैनिक म्हणून कामाला केलेली सुरुवात, शिवसेनेतून बाहेर पडण्याचा निर्णय आणि बाळासाहेब ठाकरेंबरोबर कसे संबंध राहिले याबद्दल माहिती दिली. बाळासाहेब ठाकरे यांनी मला योग्य वेळी माफ केले. मी देखील त्यांच्याजवळ गेलो, असे भुजबळ म्हणाले. शिवसेना संपली पाहिजे असे एकाही मराठी माणसाला वाटणार नाही, असे छगन भुजबळ म्हणाले.

एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. या सगळ्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्यापासून दूर का गेलो त्याबद्दल अनेक कारणं दिली जातात. दोन चार वेळा आणि आज सुद्धा बाळासाहेब ठाकरेंना अटक करणाऱ्यांजवळ कसे जाऊन बसलात, असा प्रश्न शिंदे गटाचे आमदार प्रश्न विचारत असतात. या सगळ्या गोष्टी घडून २० ते २५ वर्ष झाली आहेत. नवीन शिवसैनिकांना आणि आमदारांना या गोष्टी माहिती असण्याची शक्यता नाही. जुन्या शिवसैनिकांना हे माहिती असेल. मी शिवसेना स्थापन झाल्यापासून त्यामध्ये सहभागी झालो. शिवसेनेच्या आंदोलनात होतो. शिवसेनेचे पहिले शाखा प्रमुख झाले, त्यात मुंबईतले १० ते १५ शाखाप्रमुख होतो त्यात मी होतो. मुंबईचा महापौर आमदार मी झालो, असे छगन भुजबळ म्हणाले.

विविध आंदोलनात अटक करण्यात आली होती. काही आंदोलनात मार देखील खावा लागला. बेळगावातील आंदोलनाला गेलेल्या दुसऱ्या बॅचचे मी नेतृत्त्व केले होते. कन्नड पोलीस आता येऊ देणार नाहीत अटक करणार हे माहिती होते. त्या दिवशी वेषांतर करुन गेलो होतो, त्यावेळी मला मार बसला, दोन महिन्यानंतर सुटलो, असे छगन भुजबळ म्हणाले. आंदोलन करत शिवसेना वाढवण्याचे काम केले. शिवसेना भाजपचा पहिला समझोता झाला त्यावेळी दोन तीन लोकं होतो त्यात मी होतो, असे छगन भुजबळ म्हणाले.

मंडल आयोगाच्या मुद्यावरुन बाळासाहेब ठाकरे आणि माझे मतभेद झाले. यातून आम्ही १८ जण बाहेर पडलो. आमच्या १८ पैकी ६ जण माघारी गेले. १२ जण काँग्रेसमध्ये गेलो, असे छगन भुजबळ म्हणाले. १९९९ मध्ये आमचे सरकार आल्यानंतर शिवाजी पार्कवर झालेल्या जाहीर सभेत ९२-९३ च्या दंगली प्रकरणी श्रीकृष्ण आयोगाने ज्यांना आरोपी म्हटले होते त्यांना अटक करु अशी घोषणा केली होती. आमच्या पक्षाच्या घोषणेप्रमाण मी त्या फाईलवर सही केली होती. बाळासाहेब ठाकरेंना अटक होणार अशा चर्चा सुरु झाल्यानंतर त्यावेळचे पोलीस अधिकारी एम.एन. सिंग यांना मी बाळासाहेब ठाकरेंची पोलीस कोठडी मागायची नाही असे सांगितले होते. बाळासाहेबांच्या जामीनाला विरोध करायचा नाही. कोर्टाने कोठडी घेण्यास सांगितल्यास मातोश्रीला गृहमंत्र्यांच्या अधिकारात जेल जाहीर करायचे असे सांगितले होते, पण बाळासाहेब ठाकरे त्यामधून सुटले, असे छगन भुजबळ म्हणाले.

२००८-०९ च्या दरम्यान अब्रुनुकसानीच्या केसची सुनावणी झाली होती. त्याचा निकाल लागणार होता, काय होणार हे स्पष्ट होतं. मी कार्यालयात बसलेलो असताना सुभाष देसाई आणि संजय राऊत आले होते. बाळासाहेब ठाकरेंची प्रकृती बरी राहत नाही आणि वय झाले आहे. आपल्या केसच्या संदर्भात आम्ही आलोय असे ते म्हणाले. बांद्रा कोर्टात केस होती, त्यांना मी काही न बोलता जायला सांगितले. कोर्टाच्या तारखेला मी ही केस मागे घ्यायची असल्याचे सांगितले आणि ती केस मागे घेतली. कोर्टातून बाहेर आल्यावर उद्धव ठाकरे उभे होते, त्यांनी बाळासाहेबांना चहाला बोलावले असल्याचे सांगितले मी नंतर येतो, असे छगन भुजबळ यांनी सांगितले. त्या दिवसानंतर १५ दिवसानंतर बाळासाहेब ठाकरेंना भेटायला सहकुटुंब गेलो. त्या दिवसानंतर बाळासाहेब माझ्याबद्दल काही बोलले नाहीत आणि नंतर मी देखील पुन्हा त्यांच्या विरोधात बोललो नाही, असे छगन भुजबळ म्हणाले.

## मला व्हीआयपी ट्रीटमेंट नको : मुख्यमंत्र्यांचे पोलिसांना निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्र्यांच्या वाहनांचा ताफा प्रवास करत असताना सुरक्षेच्या कारणास्तव प्रवास मार्गिकेवरील वाहतूक रोखून ठेवण्यात येते. मात्र, त्यामुळे वाहतुकीचा नाहक खोळंबा होऊन वाहनचालकांना मनस्ताप होतो. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला स्पेशल प्रोटोकॉल नको, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. याबाबत त्यांनी आज पोलीस महासंचालक रजनीश सेठ आणि पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याशी चर्चा करून याबाबतचे निर्देश दिले आहेत.



यापुढे मुख्यमंत्र्यांच्या प्रवास मार्गीकेवरील पोलीस बंदोबस्त कमी करुन कुठेही वाहने अडवली जाणार नाही, याची खबरदारी घ्या अशी सूचना त्यांनी दिली आहे. हे सर्वसामान्यांचे सरकार असून व्हीआयपींपेक्षा सर्वसामान्य नागरिकांना प्राधान्य असल्याचे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री या नात्याने सतत प्रवास करावा लागतो. त्या प्रवासात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी प्रवास मार्गावरील वाहतुक रोखण्यात येते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. तसेच या बंदोबस्तासाठी अनेक पोलीस तैनात केले जात असल्याने पोलीस दलावर कामाचा ताणही वाढत असल्याचे गेले तीन चार दिवस प्रवास करताना मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास येत आहे.

या साऱ्या गोष्टींमुळे लोकांना त्रास सहन करावा लागतो. अतिमहत्वाच्या कामांसाठी निघालेल्या लोकांचा खोळंबा होतो. रुग्णवाहिका त्या कोंडीत अडकून पडली तर रूग्णाच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाची सुत्रं हाती घेतल्यानंतर आपल्या या प्रवासाचा नाहक त्रास वाहनचालकांना नको, अशी मुख्यमंत्री शिंदे यांची भूमिका आहे.

## पुण्याकडे जाणाऱ्या ट्रेनखाली तरुणाचा चिरडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** पूर्णा रेल्वे स्थानकापासून जवळच असलेल्या लोको शेड परिसरातील रेल्वे रुळावर अर्ध नग्न अवस्थेत एक ३० वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अर्ध नग्न अवस्थेत आढळलेल्या युवकाच्या मृत्यूमागे घातपात आहे की आत्महत्या याविषयी उलट सुलट चर्चा ऐकण्यास मिळत आहेत. याप्रकरणी, रेल्वे पोलिसांमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पोलीस अधिक तपास करत आहेत. पूर्णा शहरातील इक्बाल नगरीतील लोको शेड मधून नांदेड ते अकोला हा मार्ग जातो. या नांदेड - अकोला मुख्य लाईन वर एका ३० वर्षीय युवकाचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह रेल्वे रुळाच्या मधोमध पडला असल्याची माहिती पूर्णा शहरामध्ये वाऱ्यासारखी पसरली. सदरील युवकाने आत्महत्या केली आहे की त्याची कोणी हत्या केली आहे.

या घटनेची माहिती त्या ठिकाणी जमा झालेल्या नागरिकांनी रेल्वे पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस कर्मचारी रवी राठोड यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला. मयत व्यक्तीजवळ त्याची ओळख पटेल अशी कुठलीही कागदपत्र आढळून आले नाहीत. अनोळखी इसमाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पूर्णा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे.



# भारत आणि शिंजो आबे

आधुनिक केसरी

शुक्रवारची सकाळ ही जपानसह भारतासाठीही धक्कादायक ठरली आहे. जपानचे माजी पंतप्रधान शिंजो आबे यांचे निधन झाले आहे. शुक्रवारी सकाळी नारा शहरात एका रॅलीदरम्यान हल्लेखोराने त्यांच्यावर हल्ला केला आणि त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे त्यांची प्रकृती चिंताजनक होती. डॉक्टरांनी त्यांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र त्यांना वाचवता आले नाही. जपानच्या एनएचके वर्ल्ड रेडिओने त्यांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. ते शुक्रवारी सकाळी पश्चिम जपानमधील नारा शहरात एका निवडणूक सभेला संबोधित करत होते. यादरम्यान त्याच्या अगदी जवळ आल्यावर हल्लेखोराने त्याच्यावर एकापाठोपाठ दोन गोळ्या झाडल्या. शिंजो आबे यांच्यावरील प्राणघातक हल्ल्यात त्यांच्या छातीत गोळी लागली होती. शिंजोवरील हल्ल्यामुळे केवळ जपानच नाही तर भारतालाही दुःख झाले आहे. संपूर्ण भारत त्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करत होता. आबे भारतीयांच्या पसंतीस उतरण्यामागे एक मोठे कारण आहे. आबे यांचे भारताशी विशेष संबंध होते. जपान आणि भारत यांना जोडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. योग, सिनेमा, खाद्यपदार्थ याबरोबरच भारतीय संस्कृतीचेही ते खुलेपणाने कौतुक करत होते. भारतीय संस्कृती आणि खाद्यपदार्थ जपानमध्ये किती लोकप्रिय आहेत हेही शिंजो यांनी सांगितले होते. शिंजो यांच्या कार्यकाळात जपानचे भारतासोबतचे वेगळ्या संबंध उंचीवर गेले. भारताशी घनिष्ठ संबंधांचे ते पुरस्कर्ते राहिले आहेत. यामुळे २०२१ मध्ये भारताने त्यांना पद्मविभूषण हा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला होता. शिंजो आबे हे भारतासाठी अतिशय खास नेते होते. आंतरराष्ट्रीय मंचावर भारताच्या बाजूने उभे राहणे असो किंवा संकटकाळात भारताला मदत करणे असो, शिंजो आबे यांच्या नेतृत्वाखाली जपानने नेहमीच भारताला साथ दिली. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील भागीदारीसह शिंजो आबे यांनी भारत-जपान संबंधांना नव्या उंचीवर नेले. शिंजो आबे यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात भारताला भेट दिल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधांना नवी दिशा दिली. शिंजो आबे हे २०१४ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतात आलेले जपानचे पहिले पंतप्रधान होते. यावरून त्यांचे भारताशी असलेले सखोल नाते दिसून येते. माजी पंतप्रधान शिंजो आबे यांना भारतासोबत चांगले संबंध हवे होते. भारतातील यूपीए सरकार असो किंवा एनडीएचे असो, जपानशी भारताचे संबंध वाढतच गेले, याचे कारण हेच होते.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# नेमणुकांतील दिरंगाई

आधुनिक केसरी

**कुलगुरूंची मुदत कधी संपणार हे आधीच माहिती असते. त्यामुळे तत्पूर्वी तीन महिने आधीच निवड प्रक्रिया सुरू करून, सध्याच्या कुलगुरूंची मुदत संपण्यापूर्वी नियुक्ती जाहीर करून, येणाऱ्या कुलगुरूंना सोयीचे व्हावे असे बघणे, फारसे कठीण नाही. पण नावीन्य पूर्ण कल्पना राबवायला, सुचायला वेळ कुणाकडे आहे?**

काही महिन्यांपूर्वी तेलंगणातील जवळपास डझन भर विद्यापीठात नियमित कुलगुरूच नव्हते. साधारण दोन वर्षे मंत्रालयातील आयएएस अधिकारी कारभार हाकत होते प्रभारी म्हणून. तो काळ करोनाचा होता. अनेक महत्वाचे शैक्षणिक निर्णय तातडीने घेणे गरजेचे होते. पण कुणालाच कसची पर्वा नव्हती. मा. राज्यपाल जे कुलपती असतात, तेही चूप होते. सध्या महाराष्ट्रात काही विद्यापीठात प्रभारी कुलगुरू आहेत. तिथे तर आधीचे सरकार, मंत्री अन् मा. राज्यपाल यांच्यात शीतयुद्ध सुरू होते. नेमणुका कोणी करायच्या, कशा करायच्या हाच मूलभूत वाद! खरे तर हे अधिकार राज्यपालांचे. सरकारने त्यात हस्तक्षेप करायला नको. पण मग मंत्र्याकडे खेटे घालणार कोण? हाजी हाजी करणार कोण? देवघेव करणार कोण? खरे तर कुलगुरूंची मुदत कधी संपणार हे आधीच माहिती असते. त्यामुळे तत्पूर्वी तीन महिने आधीच निवड प्रक्रिया सुरू करून, सध्याच्या कुलगुरूंची मुदत संपण्यापूर्वी नियुक्ती जाहीर करून, येणाऱ्या कुलगुरूंना सोयीचे व्हावे असे बघणे, फारसे कठीण नाही. पण नावीन्य पूर्ण कल्पना राबवायला, सुचायला वेळ कुणाकडे आहे?

राज्य सरकारचेच चुकते असे नाही. केंद्र सरकारही हेच करते. अनेक आयआयटी, एनआयटीचे निर्देशक, गव्हर्निंग बोर्डाचे अध्यक्ष याच्या नेमणुका महिने सोडा, वर्ष अधिक रखडलेल्या असतात. तेव्हा प्रश्न हा निर्माण होतो की या नेमणुका न करताही कारभार चालत असेल तर मग या पदाची गरजच काय? डायरेक्टर, अध्यक्ष, कुलगुरू यावर होणारा खर्च वाचवा अन् प्रभारी मंडळींकडून कारभार चालू द्या. विनोदाचा भाग असा की नियमित कुलगुरू नसताना विद्यापीठाचा कारभार शांतपणे चालतो. मोर्चे, आंदोलने हे नियमित कुलगुरू साठी राखीव असतात! हे विधान विचित्र वाटेल पण सत्य आहे!

ही पदे प्रशासनिक आहेत. जबाबदारीची आहेत. प्रभारी व्यक्ती, अधिकारी महत्वाचे निर्णय घेण्याचे टाळतात. स्टाफच्या नेमणुका, प्रयोग शाळासाठीची लाखो, करोडोची खरेदी, नवीन बांधकाम हे सारे प्रलंबित राहते. नवे नियमित अधिकारी आलेत की तेच निर्णय घेतील असे टालमटाळ धोरण असते. त्याचा संस्थेच्या विकासावर परिणाम होतो. पण त्याची कुणाला, म्हणजे सरकारला पर्वा नसते!



अनेकदा चुकीच्या नेमणुका होतात. त्या व्यक्ती येता येता आपले रंग दाखवतात. मग अशा नेमणुका रद्द करण्याची, त्यांना बरखास्त करण्याची नामुष्की सरकारवर येते. मोठमोठ्या जबाबदारीच्या पदाच्या बाबतीत हे घडते. अशी उदाहरणे भरपूर आहेत. पण तेउल्लेख मुठी बंद असलेलेच बरे!

परदेशात अशा महत्वपूर्ण नियुक्त्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरची, तज्ञ मंडळीची शोध समिती असते. ती निवड पद्धत संपूर्णपणे पारदर्शी असते. जात, धर्म, लिंग असे कुठलेही भेदभाव न करता मोठ्या पदावरील नियुक्त्या केवळ अन् केवळ गुणवत्ते चे निकष लावूनच केल्या जातात. आपल्याकडे सारे दोर सरकारला, मंत्र्यांना आपल्या हाती ठेवायचे असतात. जात धर्माचे, निवडणुकीचे गणित सांभाळायचे असते. एका राज्यात एक वर्षापूर्वी डझनभर कुलगुरू एकदम नेमले गेले. तेव्हा सर्व वृत्तपत्रात त्याच्या नावापुढे कंसात जातीचा उल्लेख होता! ही बातमी सरकारचं प्रेस रिलिज होतं!

एकीकडे आपण जागतिक स्पर्धा, जागतिक मानांकन, गुणवत्तेच्या गप्पा मारतो, महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो.. पण आपली ही अशी धोरणं त्यावर बोळा फिरवतात. सगळा चिखल करून सोडतात.

निदान शिक्षण, संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रांत तरी सरकारने लुडबुड करू नये. आपल्याकडे प्रतिभावंत व्यक्तीची कमी नाही. त्यातून, सचोटीचे, प्रामाणिक, निष्ठावंत निवडणे कठीण नाही. त्यांच्यावर सारे सोपवावे. हवे तर त्या कार्य पद्धतीचे ऑडिट व्हावे.

कुठलीही पद्धत शंभर टक्के निर्दोष नसते. पण सुधारणा करता येतात अनुभवातून. आपण चुका करीतच शिकत जातो. पुढे जातो. त्यासाठी आधी इच्छा शक्ती हवी.आजच्या स्थिती पेक्षा, उद्याची, परवाची स्थिती अधिक चांगली, सर्वोत्तम असायला हवी, अशी जिद्द हवी. तरच चांगले बदल होऊ शकतील. एरवी आहेच, ये रे माझ्या मागल्या!! आता राज्यात नवे वारे वाहू लागले आहेत. तेव्हा आशा करायला काय हरकत आहे?

# खेळ मांडियेला

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रीयन समाज मनावर संत विचारांचा खोलवर परिणाम झालेला आहे. संत विचारांचे प्रतिबिंब आपल्याला इथल्या प्रथा, परंपरा इतकेच नव्हे सामाजिक चळवळीमध्येही पहायला मिळते. आणखी स्पष्ट शब्दांत सांगायचे झाले तर महाराष्ट्रीयन समाज मनाची मशागत समताधिष्टित संतविचाराने केली. म्हणूनच इथे सामाजिक बदलांच्या चळवळी उभ्या राहिल्या आणि त्यांनी समृद्ध महाराष्ट्र उभा केला. या संत विचारांचा जागर आपण करणार आहोत.**



ह.भ.प. शामसुंदर महाराज
सोन्नर, फोन -9892673047

मध्ययुगीन प्रबोधन चळवळीचा भाग म्हणून संत परंपरेकडे पाहिले जाते. हे संत आंदोलन काही सहज उभे राहिले नाही तर समाजाची एक नीकड म्हणून ते उदयास आले. साधारण बाराव्या तेराव्या शतकाच्या आसपास हे संत आंदोलन उभे राहिले. खरे तर पूर्वापार चालत आलेल्या भक्ती परंपरेला या संत चळवळीने काही धक्के दिले. अर्थात त्यावेळी त्यांनी जे धक्के दिले त्याचे परिणाम तत्काळ जाणवले नसले तरी सामाजिक बदलाची पायाभरणी त्यानी त्यावेळी केली असे म्हणता येईल. त्यांनी त्यावेळी रुजविलेल्या प्रकाश बीजांची फलश्रुती आज आपल्याला काही प्रमाणात दिसू लागली आहे. अज्ञाने अंधारलेल्या समाज मनाला ज्ञानाच्या उजेडात योग्य वाटा दाखविण्याची किमया संतानी केली.

म्हणून नामदेव महाराज आपल्या कीर्तनाचा उद्देश स्पष्ट करताना म्हणतात -

**नाचू कीर्तनाचे रंगी ।**
**ज्ञानदीप लावू जगी ।।**

तर संत तुकाराम महाराजही अंधारलेल्या वाटा उजळून सत्य असत्याचा निवाडा करण्यासाठी आपण आलो असल्याची ग्वाही देताना म्हणतात -

**उजळावया आलो वाटा.**
**खरा खोटा निवडा ।।**

ज्या काळात कर्मकांडे, जातीय, धार्मिक कट्टरतेचे स्तोम माजलेले होते. चातुर्वण व्यवस्थेच्या टाचेखाली समाज रगडला जात होता. असे वातावरण कधीही परकीय आक्रमकांना आपली सत्ता रुजविण्यासाठी अनुकूल असते. याच काळात परकीय आक्रमकांनी आपली मुळे इथे रुजवायला सुरुवात केली. म्हणजे परकीयांचा सत्तालोलूप मस्तवालपणा आणि स्थानिक वर्चस्ववाद्यांची मग्रूरी यात समाज भरडला जात होता. त्यावेळी संतांची प्रबोधन चळवळ उभी राहिली.

तामिळनाडूमध्ये अलवार, कर्नाटकात लिंगायत तर महाराष्ट्रात वारकरी संत परंपरा रुजली. आज सातशे वर्षे वारकरी संतांनी उभी केलेली ही भागवत धर्माची भक्कम इमारत उभी आहे. जात व्यवस्था हा इथला स्थायी भाव असतानाही वारकरी संतांनी उभ्या केलेल्या भागवत धर्माच्या इमारतीत सर्वांनाच समान अधिकार मिळाला. गेली सातशे वर्षे या वारकरी परंपरेने सर्व जाती, धर्म, पंथ, प्रांत यांना सारख्याच प्रेमाने आपल्यात सामावून घेतले. पंढरपूरच्या वाळवंटात मांडलेल्या या खेळात सर्वच इतके रंगून गेले की सर्व भेद आपोआप गळून पडले. किंबहूना त्यासाठीच आम्ही पंढरपूरच्या वाळवंटात हा जात-धर्म विरहित भागवत धर्माचा खेळ मांडलेला आहे, असे तुकाराम महाराज म्हणतात. या मांडलेल्या खेळामुळे भेदा भेदातून निर्माण होणार क्रोध आणि कुणाला तरी कनिष्ठ समजून आपण श्रेष्ठ असल्याचा अभिमान याला आम्ही पावटणी केली आहे. परिणामी आता कुणीच उच्च किंवा नीच रहात नसल्याने सर्वजण एकमेकांच्या पायाला लागतात, असे एका अभंगात तुकाराम महाराज म्हणतात. ज्या अभंगातील काही भाग प्रसिद्ध गायिका लता मंगेशकर यांनी गायल्याने तो अभंग घराघरात पोहचलेला आहे. तो अभंग असा -

खेळ मांडियेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ।।
क्रोध अभिमान केला पावटणी । एक एका लागतील पायी रे ।।1।।

या खेळामध्ये कोणतेही अवघड कर्मकांड नाहीत. कोणेतेही बाह्य उपचार नाहीत. गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गोपीचंदनाचा टीळा लावला की, अन्य कोणताही देखावा करावा लागत नाही. टाळ-मृदंगाच्या तालावर आम्ही पवित्र नामावळी गातो तेव्हा आपोआपच आनंदाचाकल्लोळ निर्माण होतो. या आनंद कल्लोळात पंडित, ज्ञानी, योगी, महानुभाव, सिद्ध, साधक, मूढ इतकेच नव्हे तर स्त्री आणि पुरुष हे सर्व भेद गळून पडले आहेत. हे सांगताना **तुकाराम महाराज म्हणतात-**

**लुब्धली नादी लागली समाधी । मूढजन नर नारी लोका रे ।।**
**पंडित साधक योगी महानुभाव । एकचि सिद्ध साधका रे ।।**

ज्याला मूढ म्हणजे बुद्धू समजले जाते, अशा बौद्धिक क्षमता कमी असलेल्यांपासून ते वेदशास्त्रांचा अभ्यास करून एका बौद्धिक उंचीवर पोहचलेले पंडित, मौक्ष-मुक्तीच्या लालसेने साधना करणारे साधक, योगाच्या माध्यमातून समाधी अवस्थेच्या स्वानंदात तल्लीन होणारे योगी, मानुभाव या सर्वांचा अधिकार, क्षेत्र वेगवेगळे आहेत. एरवी समाजात वावरताना आपल्या उपाधीच्या श्रेष्ठत्वाचा डोलारा घेऊन मिरवणारे एकदा का पंढरपूरच्या वाळवंटात मांडलेल्या खेळात सहभागी होतात तेव्हा त्यांच्या या सर्व उपाध्या गळून पडतात तेव्हा उरत ते केवळ निखळ माणूसपण!

या अभंगाचे पूढचं चरण तर खूपचं महत्वाचे आहे. तुकाराम महाराज म्हणतात, अहो पंढरपूरच्या वाळवंटात आम्ही जो खेळ मांडलेला आहे ना त्यामुळे वर्णाचा अभिमान गळून पडला. खरं तर इथल्या वर्णव्यवस्थेने भेदाभेदाचा कळस गाठलेला होता. त्यालाच या खेळाने सुरुंग लावला आहे. खरं तर वर्ण व्यवस्थेने निर्माण केलेल्या उच-नीच व्यवस्थेत खालच्या वर्गातल्या लोकांनी उच्च वर्णीयांच्या पायावर लोटांगण घालावे, अशी प्रथा होती. पण तुकाराम महाराज सांगतात आम्ही मांडलेल्या या खेळामुळे वर्णाचा अभिमान गळून पडला आणि त्याचा परिणाम सर्वजण एकमेकांच्या पाया पडू लागले आहेत. केवढी मोठी क्रांती केली. उच्च-नीच भेदाने जे चित्त गढूळ झाले होते. ते चित्त आम्ही मांडलेल्या खेळामुळे इतके निर्मळ झाले की, दगडालाही आता पाझर फुटले आहेत.

**वर्णाभिमान विसरली याती । एकमेका लोटांगणे जाती ।।**
**निर्मळ चित्ते झाली नवनीते । पाषाणा पाझर फुटती रे ।।**

निर्मळ मनाने उचनीचतेच्या गढूळपणा वारून स्वच्छ समाज निर्मितीची वाट संत चळवळीने मोकळी केली. अवघड दुस्तर वाटा मोडून टाकून भक्तीपंथ बहुसोपा केला.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संजीवकुमार : एक शापित जीवन



सुरेश सिरसीकर
संपर्क क्र. 9146040000

आधुनिक केसरी

**9 जुलै १९३८ संजीव कुमार यांचा जन्म दिवस. संजीवकुमार गुजरातमधील सुरतचे जरी असले तरी त्यांचा जन्म हा सांताक्रुझ मुंबईचा. पण याधी आपण संजीव कुमार यांची कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेऊ, जी फार कमी लोकांना माहीत आहे.**

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

संजीव कुमार अशा कुटुंबातून येतात ज्या कुटुंबातील लोक ५० वर्षांपेक्षा जास्त आयुष्य जगले नाहीत. तो स्वतः ही ४७ वर्षच जगू शकला. त्याच्या आधी त्याचा छोटा भाऊ नकुल याचा मृत्यू झाला, तर त्याचा दुसरा भाऊ किशोर सहा महिन्यांनंतर मरण पावला. संजीव कुमार हे नाव त्यांना चित्रपट क्षेत्राने दिले. त्यांचे खरे नाव हरिहर जेठालाल जरीवाला. संजीवकुमार यांचे वडील जेठालाल यांचे तीन लग्न झाली होती. पहिली पत्नी शांतीला दोन मुली होत्या जसवंती व लक्ष्मी पण शांती यांचं लवकरच निधन झालं. त्यानंतर जेठालाल यांनी दुसरं लग्न केलं आणि आधीच्या पत्नीच्या स्मरणार्थ दुसऱ्या पत्नीचे ही नाव शांती ठेवलं गेलं. तिला भगवती नावाची मुलगी होती. भगवती १० महिन्याची असतानाच जेठालाल यांच्या दुसऱ्या पत्नीचे ही निधन झाले. दुसऱ्या ही पत्नीच्या निधन झाल्याने जेठालाल यांच्या खूपच जिव्हारी लागले. त्यांनी परत लग्नाचा विचार नाही केला. त्यांनी संपूर्ण लक्ष्य आपल्या व्यवसायात घातले. आपला चुलत भावाला भागीदारीत घेत व्यवसायात मोठी भरारी घेतली. सुरत वरून मुंबईतील सांताक्रुझला स्थायिक झाले. सांताक्रुझ येथे मोठी बिल्डिंग घेतली. त्या बिल्डिंगचे नाव "शांतिसदन" असे ठेवण्यात आले. प्रचंड संपत्ती आल्यानंतर पाहुण्यांनी जेठालाल यांना तिसऱ्या लग्नासाठी आग्रह धरला. दुसऱ्या पत्नीच्या निधनानंतर दहा वर्षांनी जेठालाल लग्नासाठी तयार झाले. जावरबेन हे जेठालाल यांच्या तिसऱ्या पत्नीचे नाव. तिसऱ्या पत्नीचे ही पहिल्या पत्नीच्या स्मरणार्थ शांती नाव ठेवण्याचं जेठालाल यांनी ठरवलं पण शांती हे नाव तुझ्यासाठी अनलकी आहे तर हे तू ठेवू नको म्हणून पाहुण्यांनी जेठालाल यांची समजूत काढली. मग जेठालाल यांनी आपली तिसरी पत्नी जावरबेन यांचं नाव शांताबेन ठेवलं. लग्नाच्यावेळी शांताबेन यांचं वय १४ होते. पाच वर्षांनी शांताबेन यांनी हरिहर म्हणजेच संजीव कुमार यांना जन्म दिला. हरिहरला दोन भावंडे आणि एक बहिण होती. भावाची नावं नकुल, किशोर तर बहिणीचे नाव गायत्री. हरिहर ११ वर्षाचा असतांनाच हरिहरचे वडील जेठालाल यांचे वयाच्या ४७ व्या वर्षी हार्ट अटॅकनी निधन झाले. शांताबेन यांच्यावर मोठं संकट कोसळलं. मुलं लहान होती. शांताबेन भोळी आणि अशिक्षित असल्याने जेठालाल यांच्या भावाने आणि बिझनेस पार्टनर ने शांताबेन यांच्या बोटाचे ठसे घेऊन संपूर्ण व्यवसाय आणि घर आपल्या ताब्यात घेतलं. शांताबेन कोर्टात गेल्या. शांता बेन यांना समजल्यावर आकाशच त्यांच्यावर कोसळलं. "शांती भवन" त्यांना सोडावं लागलं. तीन लहान मुलांना घेऊन या बाईचा मुंबई सारख्या ठिकाणी कसा निभाव लागणार, असं घरच्यांना, पाहुण्यांना व लोकांना वाटू लागले पण मुलं बापापेक्षा ही मोठी होतील, असा तिचा ठाम विश्वास होता. तिने कोर्टात केस टाकली, केस जिंकली पण खूप कमी वाटा तिच्याकडे आला. शांती भवन तिच्या हातून गेलं. दोन रूम चे घर मिळालं. जरी चा व्यवसाय सुरू केला. आर्थिक अडचणीमुळे हरिहर म्हणजेच संजीवकुमारला इंग्लिश स्कूल मधून गुजराती स्कूल मध्ये टाकलं गेलं. संजीव कुमारचे बालपण म्हणजे ७० च्या दशकातील एखाद्या चित्रपटाच्या कथेसारखाच.

**बालपण :** संजीव कुमारचे बालपण म्हणजे ७० च्या दशकातील एखाद्या चित्रपटाच्या कथेसारखाच होता. जेठालाल यांचं निधन झाल्याने घराची सगळी जवाबदारी शांतीबेन वर पडली. सगळी संपत्ती जेठालालचा चुलत भाऊ आणि बिझनेस पार्टनर यांनी मिळून हडप केलेली होती. शांतीबेन यांनी केस जिंकली पण संपत्तीचा खूप कमी वाटा त्यांना मिळाला. दोन रूम चे घर मिळालं. आर्थिक अडचणीमुळे दोन पैकी एक रूम भाड्याने दिली होती. हरिहर म्हणजेच संजीव कुमारला इंग्लिश स्कूल मधून काढून गुजराती स्कूल मध्ये टाकलं. घर सांभाळण्यासाठी शांतीबेनने जरीचा व्यवसाय सुरू केला. त्यावेळी त्यांच्या समाजात स्त्रीने काम करणे निषिद्ध मानलं जात होतं, यामुळे संजीवकुमार ला नेहमी आई बाबत अभिमान असे. बाल हरिहरला आईची वाईट परिस्थिती पाहवत नव्हती. तो रोज आईला म्हणायचा मी ही तुझ्यासोबत काम करतो. पण शांतीबेनने शाळा ही किती महत्वाची आहे, हे हरिहरला पटवून सांगितलं. शाळा सुटल्यावर मग आईच्या कामात तो मदत करायचा. तिची ऑर्डर्स वर पत्ता लिहून टी ऑर्डर पोस्टामध्ये पोहचवायचे काम बाल हरिहर करू लागला. पुढे संजीवकुमार का कंजूस झाला, यावरून लक्षात येते पण कुणाचे जर पैशाअभावी कुठलं काम थांबलं असेल, अडलं असेल तर संजीवकुमार नक्कीच त्याला मदत करायचा. अशीच मदत संजीव कुमारने सुभाष घईला केली होती, "विधाता" च्यावेळी.

दोन रूम पैकी एक रूम भाड्याने दिल्यामुळे एका रूममध्ये आई चार भावंडं असा परिवार होता, त्यामुळे हरिहरला अभ्यासाची अडचण जाणवू लागली. तेंव्हा शाळेमध्येच एक रूम त्याला अभ्यासासाठी मिळाली. गणित, विज्ञान विषयाबरोबरच नाट्यशास्त्र हा ही विषय त्या शाळेत होता. सध्याचे नानावटी विद्यालय. नाटकातील त्याचे टॅलेंट पाहून नाट्यशास्त्राच्या शिक्षकांनी हरिहरला सपोर्ट केला. शांताबेनला कळलं की तिचा मुलगा हरिहर नाटकात जास्त रुची घेतोय, ती दुःखी झाली, तिला वाटले आता आपला मुलगा काही करू शकणार नाही. ती थेट नाट्यशास्त्राच्या शिक्षकाकडे आली आणि विनंती केली की आपल्या मुलाला दूर ठेवा. तो गरीब घरचा आहे. तो कुठल्या स्टारचा मुलगा नाही की त्याला लगेच काम मिळेल. पण शिक्षकांनी तिला समजावून सांगितलं की तो खूप हुशार आहे, तो एक दिवस नाव करेल. पण शांताबेन यांचं समाधान नाही झालं. संजीव कुमारचे चक्क सोळव्या वर्षी साखरपुडा करून टाकला. जेणे करून लग्नानंतर त्याला जबाबदारी कळेल आणि कामाला लागेल. पण हा साखरपुडा, साखरपुड्या इथपर्यंतच मर्यादित राहिला. संजीव कुमार ला लग्न करायचे नव्हते. तो बॉलीवूडचे स्वप्न रंगवायला लागला होता.

**फिल्म मनिया :** एकीकडे आईला हरिहरच्या फिल्म मनियाने दुःखी केलं होतं. आपल्या मुलाचं भविष्य अंधकारमय वाटायला लागलं होतं तर एकीकडे हरिहर बॉलीवूडचे स्वप्न पाहू लागला होता, फक्त स्वप्नंच पाहत नव्हता तर त्यासाठी तो प्रचंड मेहनत ही घेत होता. त्यांच्यासोबतच शाळेत नाटकात काम करणारा त्याला मित्र मिळाला होता, ज्याचे विचार संजीवकुमारशी जुळत होते त्याचे नाव सत्येन कप्पु (शोले मधला रामलाल) या दोघांनी १९५२ ला "बैजू बावरा" चित्रपट पाहिला आणि सिनेमाच्या प्रेमातच पडले. त्यापासून दोघांनी ठरवलं की आपल्याला सिनेमातच जायचं, नायक व्हायचं. हरीहरला सिनेमाचं प्रचंड वेड लागलं. तो कोस कोस दूर पायी चालत जाऊन सिनेमाचे पोस्टर्स पाहायचा. सिनेमाचं नुसतं पोस्टर पाहिलं तरी त्याला समाधान वाटायचं. सिनेमाचा नायक होण्यासाठी ज्या काही गोष्टी लागतात, त्या सर्व गोष्टींवर तो प्रचंड मेहनत घेऊ लागला. त्याला वाटले आपल्या आवाजात प्रोब्लेम आहे. दिवस दिवस बसून एकच डायलॉग अनेक टोन मध्ये बोलण्याचा सराव करू लागला. "बैजू बावरा" पाहिल्यानंतर त्यांना फिल्म अक्टिंग चा कोर्स करण्याची इच्छा झाली. त्यावेळी अक्टिंग कोर्स साठी शशिधर मुखर्जी यांची



"फिल्मालया" नावाची संस्था नामांकित होती. पण त्याची फिस पाहून संजीवकुमार निराश झाले, त्यारात्री त्यांनी जेवणच नाही केलं. आई ने त्याची समस्या ओळखून घेतली आणि आपले सोने मोडून फीस भरण्यास सांगितले. आईचं सोनं विकून एडमिशन घ्यायला संजीवकुमार च्या मनाला पटत नव्हतं. शेवटी आईने समजावून सांगितलं.

..शेवटी "फिल्मालयात" संजीवकुमार ने एडमिशन घेतले. थोड्याच दिवसात फिल्मालयाला कळून चुकले की हा मोठ्या ताकतीचा कलाकार आहे. त्या अक्टिंग स्कूल मध्ये मॅक मोहन (शोलेतला सांभा) दोघे मिळून अक्टिंग करायचे.

एके दिवशी अभिनेता महेश देसाई फिल्मालयाला भेट दिली तेव्हां हरिहरची अक्टिंग पाहून खूप प्रभावित झाले. शशिधर मुखर्जी ना कळून चुकले की हरिहर परिपक्व झाले आहेत, आता त्यांना मोठ्या मंचची गरज आहे. हरिहरला इफ्टा इथे पाठविले गेले. तिथे त्याची भेट ए. के. हंगलशी झाली. हरिहर याच्या बोलण्यावरती तर ते प्रभावित झाले पण त्यांचा पेहराव पांढरा कुर्ता पायजमा आणि पायात चप्पल पाहून त्यांना वाटले हा काय हिरो बनणार. " तुम्हारे लायक कोई रोल रहेगा तो बता दूंगा" असं म्हणून टाळलं. पण हरिहर रोजच त्यांच्याकडे जाऊ लागला आणि कामाविषयी विचारू लागला. आणि तेच कारण देऊन ए. के. हंगल टाळू लागले.

एके दिवशी हरिहर ए. के. हंगल यांच्या नाटकाची तालीम बघत एका कोपऱ्यात बसलेला होता, तेव्हा दिग्दर्शक आर्यन सिंग यांचे लक्ष संजीव कुमार यांच्यावरती पडलं आणि त्यांनी आपल्या नाटकासाठी संजीव कुमारला काष्ट केलं. "मजमा" नावाचं शॉर्ट स्ट्रीट नाटक होतं. त्यात जादुगरची भूमिका होती. हरिहर ने लगेच होकार दिला. चार दिवसात साठ पानांचे मोठे डायलॉग होते. ते ही चार दिवसात करायचं होतं, त्यांनी हे चॅलेंज स्वीकारलं कारण त्यांना काम हवं होतं आणि महत्त्वाचं म्हणजे त्यांनी यशस्वी करून दाखविले. हे नाटक पाहून तेव्हा ए. के. हंगलला हरिहरला आपल्या नाटकात न घेतल्याचा खूप पश्चाताप झाला. ए. के. हंगलला काहीही करून हरिहरला आपल्या नाटकात घ्यायचं होतं. त्यावेळी त्यांचं "डमरू" नाटकाची जवळपास सगळी कास्टिंग झालेली होती. एकच कास्टिंग बाकी होती ते म्हणजे ६० वर्षाच्या वयोवृद्धाची आणि हरिहर याचे वय १९. पण हरिहरने ते चॅलेंज स्वीकारलं. तेव्हा शबाना आझमी यांचे वडील कैफ़ी आज़मी यांनी ए. के. हंगलला म्हणाले की, "तू चूक करीत आहेस." पण ए. के. हंगल ठाम होते. संजीवकुमार ने ते पात्र ही यशस्वी केलं. या नाटकानंतर संजीव कुमार सर्वत्र चर्चा झाली. कैफ़ी आझमी, शबाना आझमी, बासु चटर्जी या लोकांनी हरिहरची स्तुती केली. यानंतर हरिहर ने हिंदी सिनेमाकडे कूच केली. पण इथे ही प्रचंड संघर्ष होता. हिंदी सिनेमात जाण्याआधी त्यांनी आपलं नाव बदललं. आधी संजय कुमार केलं पण संजय खान "दोस्ती" मुळे प्रकाशझोतात आले होते म्हणून दोन दोन संजय नको म्हणून त्यांनी संजयचं संजीव केलं आणि संजीवकुमार म्हणून प्रसिद्धीस आले.

संजीवकुमारचं संपूर्ण जीवन संघर्षमय होतं, बालपणी संघर्ष, करिअर मध्ये संघर्ष, कौटुंबिक संघर्ष, प्रेमात संघर्ष, मृत्यूशी संघर्ष. ते व्यक्तिगत कधी सुखी नव्हते. त्यांच्या खानदान मध्ये पन्नास वर्षापेक्षा जास्त कुणी जगलं नव्हतं. त्यामुळे त्यांनाही आपणही पन्नाशीच्या आतच मरणार आहोत, याची जाणीव होती. म्हणून त्यांनी स्वतःचं घर कधी घेतलं नाही. संजीव कुमारला कंजूस मानलं जातं पण त्यांनी अडचणीत असणाऱ्या सगळ्या लोकांची मदत केली होती. आपली सगळी संपत्ती आपला भाऊ, बहीण व त्यांच्या मुलांच्या नावे केली. संजीवकुमार चे त्याच्या आईवर खूप प्रेम होते. ६ नोव्हेंबरला त्यांची आईचं निधन झाल्यामुळे ते या दिवशी ते कुठलच काम करत नसत. त्या दिवशी ते घराच्या बाहेर ही निघत नसत, जेवण ही करत नसत. संजीवकुमारचे निधन ही याच तारखेला झाले ज्या तारखेला त्यांच्या आईचे निधन झाले ६ नोव्हेंबर १९८५. वयाच्या ४७ व्या वर्षी संजीवकुमार ने जगाचा निरोप घेतला. त्यांच्या वडिलांचे निधन ही वयाच्या ४७ व्या वर्षीच झाले होते.

**प्रेम :** संजीवकुमार यांचे पहिले प्रेम नूतनशी झाले पण नूतन त्यावेळी विवाहित होती. आर्मी ऑफिसर रजनीश बहल यांची ती पत्नी होती. जेव्हा रजनीश बहल यांना या दोघांच्या प्रेमाविषयी कळलं तेव्हा नूतन वरती बंधन आली. आणि हे प्रेम, प्रेमच राहिलं. दुसरे प्रेम हेमा मालिनीशी झाले, हेमा मालिनीशी लग्न करायची इच्छा संजीवकुमारची होती पण हेमामालिनी धर्मेंद्रशी केल्यामुळे या प्रेमामध्ये ही संजीव कुमारच्या पदरात निराशाच पडली. सुलक्षणा पंडितची ईच्छा होती संजीवकुमारशी लग्न करण्याची पण संजीवकुमारचे अकाली निधन झाल्याने त्या आज ही त्या धक्क्यातून सावरल्या नाहीत.

संजीव कुमार या नावाने प्रसिद्ध असलेला हरी जरीवाला हा हिंदी चित्रपटांमधील एक अभिनेता होता. इ.स. १९६० सालातील हम हिंदुस्तानी या हिंदी चित्रपटाद्वारे त्याने चित्रपटसृष्टीत पदार्पण होते. आँधी, खिलौना, मनचली, शोले, अंगूर, नमकीन इत्यादी लोकप्रिय चित्रपटांत त्याने प्रमुख भूमिका साकारल्या. त्यांच्या सारख्या ताकदीचा अभिनेता आज ही सिनेमा क्षेत्रात झाला नाही. "नई दिन नई रात" नऊ भूमिका असलेला चित्रपट अभिनयाचा बादशाह दिलीपकुमारला डोळ्यासमोर ठेऊन लिहिण्यात आला होता जेव्हा दिलीपकुमारने स्क्रिप्ट वाचली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ही भूमिका संजीवकुमारच करू शकतो, तोच या भूमिकेला न्याय देऊ शकतो असं दिलीपकुमारने "नई दिन नई रात" च्या निर्मात्याला सांगितलं आणि हा चित्रपट संजीवकुमारकडे आला आणि संजीवकुमारने त्या नऊ भूमिकेचं सोनं केलं. इतक्या ताकतीचा हा अभिनेता होता. सुरुवातीला काम मिळविण्याकरिता ते चॅलेंजिंग रोल स्वीकारणारे संजीवकुमारनी जितके ही रोल केले जवळपास सगळे चॅलेंजिंग रोल होते. ज्यांना जमत नव्हते तिथे संजीवकुमार. अशा या महान नायकाला माझा सलाम!

# अंगात येणं धार्मिकता नव्हे अधार्मिकता



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**एकदा ढोलकी, तून तून झांज, वाजायला लागली की माणसाला नाचायची हाऊस निर्माण होते. आणि मग या धार्मिकतेच्या नावाखाली माणूस मन लावून नाचायला सुरू करतो. त्यालाच अंगात येणे असे म्हणतात. अशा वेळेला शरीराला दुखापत झाली, वेदना झाल्या तरी ते लोक सहन करतात. हाताला पायाला लागतं. बांगड्या फुटतात तरी ते लोक सोसत असतात. कारण त्याच्याशिवाय समाजमान्यता मिळत नाही. मग तोंडाला फेस येईपर्यंत नाचतील. अंगात आल्याचा आव आणतील. हे सगळं बकवास आणि चुकीचं खोट आहे. हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. तेव्हा अंगात वार येणे हे धादांत खोट आहे.**

मित्रांनो खरं पाहता अंगात येणे, अंगात वार भरने, अंगात वार येणे, देव अंगात येणे, देवी अंगात येणे, साती आसरा अंगात येणे, आसरा लागणे, म्हसोबा अंगात येणे, मसोबा लागणं अशा विविध अंगाने लोकांच्या अंगात येतं, नाही तर अंगात आणल जाते. खरं तर अंगात कधीच येत नसतं ते थोतांड आहे.

साधं आणि सोपं एक गणित सांगतो तुम्हाला. नाचायची आवड असेल, तुम्हाला गायची आवड असेल आणि तसा उपक्रम कुठे असेल तर आपोआप तुम्ही त्या उपक्रमाकडे खेचले जातात. आणि सहभागी होतात, रमतात किंवा ऐकता. असंच अंगात येणे हे याचे बोलक स्वरूप आहे.

अंगात कुणाच्या येतं? ज्यांचे शिक्षण नाही, ज्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन नाही, ज्यांना कुटुंबात समाजामध्ये स्थान नाही, लहानपणापासून ज्याच्यावर अधार्मिकतेचे संस्कार पडलेले आहेत. देव नावाच्या जाती मध्ये गुर्फटलेले लोक आहेत. अशा अशिक्षित, आर्थिक दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या वैज्ञानिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांच्या अंगामध्ये येतं. नाहीतर ते आणलं जातं हे स्पष्ट आहे. जर अंगात यायचं असेल तर सुशिक्षित देखण्या स्त्री-पुरुषांच्या अंगामध्ये देवाने लवकर यायला पाहिजे.पण देव तस करत नाही. अशिक्षितांच्या अंगामध्ये जास्त कसा जातो. हा प्रश्न कायम सतवताना दिसतो. एक प्रयोग करून तुम्ही सुद्धा पाहू शकता. आपण वय वर्ष सहा महिने ते एक वर्षे वयाच्या आतील बालकाच्या समोरून किंवा बाजूला त्याला आवडणारं गाणं लावा ते लेकरू सुद्धा नाचायला लागतं. त्याला भाषा कळत नसते. त्याला विचार करत नसतात. मात्र संगीत आवडतं. म्हणून लहान लेकरं नाचायला लागतात. हात पाय हलवतात. अगदी तसंच अंगात येणाऱ्या व्यक्तीबद्दल असतं. एकदा ढोलकी, तून तून झांज, वाजायला लागली की माणसाला नाचायची हाऊस निर्माण होते. आणि मग या धार्मिकतेच्या नावाखाली माणूस मन लावून नाचायला सुरू करतो. त्यालाच अंगात येणे असे म्हणतात.

अशा वेळेला शरीराला दुखापत झाली, वेदना झाल्या तरी ते लोक सहन करतात. हाताला पायाला लागतं. बांगड्या फुटतात तरी ते लोक सोसत असतात. कारण त्याच्याशिवाय समाजमान्यता मिळत नाही. मग तोंडाला फेस येईपर्यंत नाचतील. अंगात आल्याचा आव आणतील. हे सगळं बकवास आणि चुकीचं खोट आहे. हे विज्ञानाने



सिद्ध केले आहे. तेव्हा अंगात वार येणे हे धादांत खोट आहे. या विषयावरती भरपूर अभ्यास करून वैज्ञानिकपणा काय आहे हे डॉक्टर नरेंद्र दाभोळकर यांनी समाजाला सांगण्याचा प्रयत्न केला. सत्य विचार अंधश्रद्धा पाळणाऱ्यांना पचले नाहीत. धर्म बुडतो आहे या नावाखाली त्या व्यक्तीची हत्या झाली..... मित्रांनो अशा अनेक कार्यकर्त्यांची हत्या होते.केली जाते परंतु त्यांचा विचार कधीच बुडत नाही. म्हणजे ते जिवंत असतात. हे मात्र नक्की लक्षात ठेवावे... दुःख मात्र याचं वाटतं दाभोळकरांच्या सोबत पूर्ण महाराष्ट्रभर ही चळवळ उभी राहिली होती. स्ट्रक्चर उभ राहिलं होतं. कार्यकर्ते जोशात परिवर्तनाचे कार्य करत होते. पूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला होता. अंधश्रद्धा निर्मूलनाची एक हवा निर्माण झाली होती. मात्र दुःख याच वाटते की दाभोळकरांच्या नंतर मात्र कामाची गती हळूहळू लोप पावत जाताना दिसते. लोक पद घेऊन मिरवताना मात्र रस्त्यावरती भरपूर दिसतात. कार्य मात्र शुन्य झालेल आहे. ही चळवळ पुन्हा गतिमान होऊन समाजातल्या शेवटच्या माणसापर्यंत वैज्ञानिक दृष्टिकोन घेऊन जाणं ही काळाची गरज आहे. असे वाटते.

चला आपण वैज्ञानिक दृष्टिकोन समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करू. अंधश्रद्धेच्या नावाखाली कोणाचा बळी जाणार नाही याची काळजी घेऊ जय हिंद जय भारत.

# विसरभोळे

आधुनिक केसरी

रवींद्र व्ही. चालीकवार
संपर्क क्र. 9011559106

एक होतं गाव. त्या गावात एक विसरभोळा राहत होता. तुम्ही म्हणाल हा विसरभोळा म्हणजे तरी कोण? बिलकुल तुमच्याच वयाचा. दहा-अकरा वर्षांचा मुलगा. खरं पाहिलं तर त्याचं नाव होतं संजय. त्याच्या लक्षात कोणतीच गोष्ट राहत नसे. अगदी सकाळची गोष्ट दुपारपर्यंत तो पार विसरून जायचा. मग सर्वांना त्याची गंमत वाटायची, म्हणून त्याला गमतीनं सर्वजण 'विसरभोळे' म्हणत. हा विसरभोळे विसराळू तर होताच शिवाय कोणतंही काम करताना गडबड फार करायचा. त्याच्या या स्वभावाला त्याचे आई-बाबा जाम वैतागून गेले होते, पण करता काय ?

विसरभोळे होता बसक्या नाकाचा व ठेंगू. रंगानं तसा तो काळाच होता; परंतु पावडर लावली, की बरा दिसायचा. हाफ पँट आणि हाफ शर्ट, गळ्यात रुमाल, असा त्याचा अवतार. अशी ही स्वारी मोठ्या दिमाखानं शाळेत जायची. विसरभोळे अभ्यासात हुशार होता बरं का ! दरवर्षी त्याचा पहिला किंवा दुसरा क्रमांक यायचा.

एकदा खूपच मजा आली. बाबांनी त्याला लाँड्रीवाल्याकडून कपड्यांना प्रेस करून आणायला सांगितलं. तेव्हा तो अभ्यास करण्याच्या नादात होता. त्यानं ऐकल्यासारखं केलं व होकारार्थी मान हालवली. अभ्यास झाल्यानंतर तो आपल्या मित्रांसोबत विटीदांडू खेळायला निघून गेला. त्याच्या लक्षात ती गोष्ट राहिलीच नाही.

दुसऱ्या दिवशी बाबांना ऑफिसच्या कामानिमित्त तालुक्याच्या गावी जायचं होतं, म्हणून बाबा दुसऱ्या दिवशी लवकर उठले. अंघोळ करून कपडे पाहतात, तर जशास तसे. मग काय ? विसरभोळेला चांगला पोटभरून मार मिळाला. एवढंच नाही तर त्या दिवशीचा सकाळचा चहासुद्धा मिळाला नाही.

एकदा विसरभोळे टी. व्ही. पाहत बसला होता. कार्यक्रम पाहण्यामध्ये अगदी तल्लीन झाला होता तो. इकडे आई चहा करण्यासाठी स्टोव्हला पंप मारू लागली, पण तेल काही येईचना! त्यात तेल नसल्याचं नंतर तिला कळून चुकलं. एक डबा विसरभोळेच्या शेजारी ठेवत ती म्हणाली, "हे बघ, आता टी. व्ही. पाहणं बंद कर बघू. हा डबा घेऊन वाण्याच्या दुकानात जा आणि रॉकेल घेऊन ये."

तो टी. व्ही. पाहण्याच्या नादात असल्यामुळे त्यानं अर्धवट ऐकलं. त्यानं पायांमध्ये चपला घातल्या व गाणं गुणगुणत दुकानाकडे पळत सुटला. पळता पळता त्याच्या चपलेचा अंगठा तुटला. मग त्याला काही पळता येईना.

'असा कसा बरं अंगठा तुटला असेल ? परवाच बाबांनी नवीन चप्पल आणून दिली.' असं मनाशीच पुटपुटत त्यानं चप्पल नीट निरखून पाहिली, तर त्याला विजेचा शॉक लागल्यागत धक्काच बसला. कारण धाकट्या बहिणीची एक चप्पल व स्वतःची एक चप्पल अशा विजोड चपला त्यानं घातल्या होत्या. त्यानं इकडेतिकडे पाहिलं. आपल्याकडे कोणाचीच नजर नाही असं पाहून त्यानं हातामध्ये चपला घेतल्या आणि पुढे चालू लागला. पायाऐवजी हातात चपला आणि त्याही विजोड हे पाहून त्याची त्यालाच लाज वाटू लागली. कसाबसा तो दुकानात पोहचला व दुकानदारास तेल मागितले.



"तेलाला भांडं ?" दुकानदारानं विचारलं. "अरेच्या ! गडबडीमध्ये विसरलोच की !" असं म्हणत तो पुन्हा घरी आला. तेलासाठी डबा घेऊन दुकानाकडे जाणार तोच पावसाची एक सर आली, म्हणून त्यानं सोबत छत्री घेतली. दुकानात पोहोचल्यानंतर त्यानं तेल घेतलं.

"पैसे ?" दुकानदारानं प्रश्न केला. “पैसे आणायला तर पार विसरलो बुवा." असं म्हणत त्यानं पुन्हा घरी जाऊन पैसे आणले.

विसरभोळेचे पाय चिखलात भरले होते. घरी आल्यावर अंगणात त्याचा पाय घसरला व तो चक्क उपडाच पडला. आईनं हे दृश्य पाहिलं व ती हसू लागली.

अकरा वाजले होते. शाळेची वेळसुद्धा झाली होती. त्यानं गडबडीनं जेवण आटोपलं व वह्यापुस्तकं थैलीत भरली. तो शाळेत जायला निघणार तोच पावसानं आपली करामत दाखवली. मग तो छत्री शोधू लागला.

"आई माझी छत्री कुठे ठेवलीस गं. लवकर शोधून दे पाहू, मला वेळ होतो आहे." तो आईला म्हणाला.

“अरे तूच ठेवली असशील कुठंतरी. नीट पहा बघू." या आईच्या वाक्यानं त्याच्या लक्षात आलं, की छत्री तर आपण दुकानात विसरलो ! विसरभोळे गोंधळून गेला. काय करावं आणि काय नाही हे त्याला काहीच समजेनासं झालं. भिजत भिजत तो शाळेकडे निघाला. वाटेत दुकानातून छत्री घेतली व एकदाचा शाळेत पोहोचला.

शाळा सुरू झाली. गुरुजी शिकवत होते. विसरभोळे आपल्या बाकावर जाऊन बसला. त्यानं आपल्या थैलीतून पुस्तकं वह्या बाहेर काढल्या आणि कपाळावर हात मारून घेतला. गडबडीत त्यानं छोट्या भावाची पुस्तकं आणली होती. गुरुजींनी आधीच्या दिवशी सर्व मुलांना गणित सोडवून आणायला सांगितलं होतं. “तर मुलांनो, तुम्ही सर्वांनी आपापल्या वह्या दाखवा बरं." असं म्हणून गुरुजी सर्वांच्या वह्या तपासू लागले. विसरभोळेची जेव्हा वेळ आली तेव्हा गुरुजी त्याच्यावर जाम संतापले व त्याला चांगलीच शिक्षा केली. वर्गातील सर्व मुलं त्याच्याकडे पाहून हसू लागली. त्याला स्वतःचा खूप राग येत होता.

दिवसामागून दिवस जात होते. मार्च महिना सुरू झाला. त्याची परीक्षाही जवळ येत होती. काही दिवसांतच परीक्षेचा दिवस उजाडला. त्या दिवशी तो देवाला नमस्कार करून शाळेत पेपर सोडवण्यासाठी गेला. तिथं गेल्यावर त्याच्या लक्षात आलं, की आपलं पेन घरीच राहिलं, म्हणून तो पळत पळत घरी आला. त्या वेळेस त्याची आई पाण्यानं फरश्या स्वच्छ करत होती. तो फरशीवरून धाडकन आदळून उलटासुलटा पडला. त्याच्या पायाला मोठी जखम झाली. त्यातून भळाभळा रक्त वाहू लागलं. त्याला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यात आलं.

दवाखान्यात चांगला पंधरा दिवस राहिल्यानंतर त्याचा पाय बरा झाला. बिचाऱ्याची परीक्षा बुडाली, पण त्या दिवसापासून त्याला एक चांगली अद्दल घडली. तो प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवू लागला. कोणतंही काम काळजीपूर्वक करू लागला. दुसऱ्या वर्षी चांगला अभ्यास करून तो पहिल्या क्रमांकानं पास झाला.आता त्याला 'विसरभोळे' न म्हणता सर्वजण 'संजय' या नावानं ओळखू लागले.

# बढाईखोर माणूस

आधुनिक केसरी

एक माणूस फार वर्षे प्रवास करून आपल्या घरी आला व आपण परदेशात असताना काय मौजा पाहिल्या हे त्याने आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिखट मीठ लावून सांगितले. आणि अगदी शेवटी एक थाप ठोकून दिली की, ‘मी अलकावतीला गेलो असता तेथील लोक पंधरा-पंधरा हात उंच उड्या मारतात, पण त्यांनी माझ्याशी पैज लावली असता माझ्याइतकी उंच उडी एकालाही मारता आली नाही.’ ऐकणाऱ्या कोणालाही ही गोष्ट खरी वाटली नाही. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी तो नाना प्रकारच्या शपथा घेऊन लागला. त्या वेळी त्या लोकातील एक माणूस त्याला म्हणाला, ‘अहो, अशा शपथा कशाला घेता. हातच्या कंकणाला आरसा कशाला? या वेळी तुम्ही अलकावतीला आहात असं समजून तिथे जशी उडी मारली तशी इथंही मारून दाखवा म्हणजे झालं.’ हे ऐकताच त्या बढाईखोर माणसाचे तोंड ताबडतोब बंद झाले.



तात्पर्य—आपण प्रवासात पाहिलेल्या गोष्टी फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते, पण एखादेवेळी त्यांचेच बोलणे त्यांच्या गळ्यात येऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहात नाही.

# आतुरता पावसाची

आधुनिक केसरी

आता जवळपास संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस सुरू झालाय. पाऊस वेळेवर यावा म्हणून सगळेच प्रार्थना करतात. पण कुणाच्या प्रार्थनेला यश येत असेल तर बालकांच्याच, कारण पाऊस आला नाही म्हणून जेव्हा बालके पावसाला "रुसलास का ?" म्हणून विचारतात तेव्हा या निरागस बालकांना दुखावणे परमेश्वरालाही शक्य नाही. तसेही बालकांनी काही हट्ट केला आणि कुणी ऐकले नाही असे होतच नाही. मग परमेश्वरालाही हे अशक्यच. ही बालकांना आनंद देणारी साद पावसाने नक्कीच ऐकलीय. आकाशात धड धड धुडुम आवाज ऐकू येवू लागलेत. विजाच्या प्रकाशात नित्य दिसणारी सृष्टी अधिकच सुंदर दिसतेय. आकाशात काळ्या ढगाचे तर जणू डोंगरच दिसताहेत. आता टप टप असे जोरात पावसाचे थेंब पडत तळे साचणार. रस्ते काही काळ तुंबणार आणि हो या पावसाने शाळेला एकदिवस सुट्टी मिळणार.



बालकांच्या बोबड्या बोलातील सुलभपणे म्हणता येणारे हे सुरेल बालगीत.

**ये रे ये रे पावसा, रुसलास का ?**
**माझ्याशी गट्टी फू केलिस का ?**
**झर झर झर तू येणार कधी ?**
**अंगणात पाण्याची होईल नदी**
**ढगांच्या मागे असा लपलास का ?**
**गार गार वाऱ्यांत नाचेन मी**
**खूप खूप पाण्यात भिजेन मी**
**विजेचि टाळि मला देतोस का ?**
**धड धड धुडुम कानात बसले दडे**
**काळ्या काळ्या मेघांचे डोंगरकडे**
**टप टप पडतील थेंबांचे सडे**
**पाणि, पाणि पाणीच**
**मग सगळीकडे !**
**धुमधार पाण्यात रस्ता बुडेल**
**मग माझ्या शाळेला सुट्टी मिळेल**
**गड गड गड गड हसतोस का**

## आई - माझी...!

**सकाळी उठून आई**
**देवाची पूजा करते,**
**घरातले आवरून**
**सैंपाकासाठी बसते.**
**गरम डबा देऊन**
**शाळेमध्ये पाठवते,**
**आम्ही शाळेत असलो**
**तरी आई आठवते.**
**आईची आमच्यावर**
**असे खूप - खूप माया,**
**आम्हाला वाटते आई**
**निळ्या आभाळाची छाया.**
**शेतीची सगळी कामे**
**करे, कधी खुरपणी,**
**ज्वारी- बाजरी कापणी**
**कधी, कापूस वेचणी.**
**नेहमी सगळी कामे**
**करीत असते आई,**
**रोज-रोज काम-काम**
**सुट्टी तिला कधी नाही...!**

**- अय्युब पठाण लोहगांवकर,**
**मो. ९७६४३५०३७४.**

## बेडूकराव

**पावसाळ्यात बेडूकराव**
**करता डरॉव डरॉव**
**हिवाळ्यात, उन्हाळ्यात**
**कुठे असता राव**
**डबक्याशेजारी तुम्ही**
**मारत असता उडया**
**लहान मुलं तुमच्याशी**
**करतात सदा खोडया**
**डरॉव डरॉव करून**
**बसत नाही का गळा**
**ध्वनी प्रदूषणाचे जरा**
**नियम पाळा**
**हिवाळ्यात, उन्हाळ्यात**
**मौन करता धारण**
**समजेल का मला**
**याचे ठोस कारण ?**
**सतत पाण्यात राहाता**
**करून वस्ती**
**सर्दीपडशाची**
**वाटत नाही का भीती ?**

**- रविंद्र व्ही. चालीकवार**
**मो.9011559106**

# मित्र

आधुनिक केसरी

विनोद आणि अजय यांची खूप चांगली मैत्री होती. ते एकाच वर्गात शिकत होते. विनोद मन लावून शिकायचा पण अजयचे मन मात्र सदैव इकडे तिकडे नेहमीच भरकटलेले असायचे. वर्गात शिक्षक शिकवत असताना अजयला नेहमी बोलणी खावी लागायची ती ह्याच लक्ष न देण्याच्या कारणावरून पण विनोद मात्र नेहमीच अभ्यासात पुढे राहायचा व शाबासकी मिळवायचा. एके दिवशी विज्ञानाचे शिक्षक वर्गात शिकवीत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वहीमध्ये गृहपाठ करण्याची एक पद्धत सांगितली होती. त्यानुसार सर्व विद्यार्थ्यांनी गृहपाठ पूर्ण केला होता. पण अजयने मात्र आपल्या सवयीनुसार गृहपाठ व्यवस्थित पूर्ण केला नव्हता. त्याची वही पाहून शिक्षक रागाने त्याला म्हणाले, “हे तू काय केले आहेस? मी तर पानाच्या एका बाजूनेच लिहायला सांगितले होते पण तू दोन्ही बाजूने लिहीले आहेस.” आता अजय घाबरला. कारण शिक्षकांनी त्या दिवशी सुट्टी होण्याच्या आत वही पूर्ण करायला सांगितले होते आणि सुट्टी होण्यास फक्त दोनच तास राहिले होते. अजयला घाबरलेल्या अवस्थेत पाहून विनोदने त्याला त्याच्या लक्ष न देण्याच्या सवयीबद्दल उपदेश केला व शिक्षकांकडून परवानगी घेवून बाजारात जावून नवीन वही आणली. इतकेच नाही तर अजयसोबत बसून त्याचा गृहपाठ पूर्ण केला आणि त्याची वही शिक्षकांकडे जमा केली. त्या दिवसापासून अजयने आपल्या स्वभावात बदल केला आणि तो कोणतेही ठिकाणी लक्षपूर्वक काम करू लागला.

तात्पर्य : लक्षपूर्वक काम करणे आणि विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करणे या दोन गोष्टी पाळल्यास अनेक संकटावर मात करता येते. तसेच होणारे नुकसान टाळता येते.





# अंधार वाटेवर उजेड पेरणारी वारी



जयप्रकाश दगडे
जेष्ठ पत्रकार, लातूर

आधुनिक केसरी

**'व्होटेड' मंडळींची वारी मुंबई-सुरत-गुवाहाटी-गोवा करीत मुंबापुरीत खुर्चीपाशी विसावलेली परवा महाराष्ट्रानं पाहिली. आता 'डिव्होटेड' मंडळींची मराठमोळी वारी आणि तीतून घडणारे वैष्णवांच्या मांदियाळीचे विलोभनीय दर्शन अवघा देश घेत आहे. सावळ्या कानडाऊ विठ्ठलु चं रुप डोळांभर साठविण्यासाठी टाळांच्या गजरात, खांद्यांवर भागवतधर्माची भगवी पताका, तुळशीहार गळां, कपाळी गंध-बुक्का अन् डोईवर तुळशीवृंदावन घेऊन दिंडीत ही वारी पंढरपुराकडं ओढीनं मार्गक्रमण करते आहे. ही पायी वारी म्हणजे नवविधा भक्तीनंतरची दहावी भक्तीच ! रात्रंदिवस विठुरायाचा ध्यास नि अठरापगड जातींच्या वैष्णवांचा सत्संग ! बा.भ. बोरकरांनी म्हटल्याप्रमाणे 'पांडुरंग दाता, पांडुरंग त्राता, अतीचा नियंता, पांडुरंग' हा एकच विषय !! महाराष्ट्रातील वारकऱ्यांची पावलं आपल्या लाडक्या विठोबा-रखुमाईचं दर्शन घेण्यासाठी या पायी वारीतून पंढरी जवळ करीत आहेत. विठ्ठलाकडे त्यांचं मागणं तरी काय आहे ?...बा विठोब्बाराया... या मराठी मातीवर पाऊसधारांच्या रुपानं तुझ्या कृपाप्रसादाची बरसात कर...पांडुरंगा... लई न्हाई मागणं... काळ्या आईची कूस उजवू दे, देवराया.. या दुःखभूमीत सुखाचं पीकपाणी येऊ दे... लेकरांना आशिर्वाद दे... माऊलीsss...**

हे मराठमोळे भोळेभाबडे वारकरी मनांतलं निरांजन विझू देत नाहीत. ते विझलं नाही म्हणजे मग पंढरीच्या वाटेवरचे 'तुळशीचे मळे' आभाळभर बरसत राहतात. जगायचं कसं? कण्हत- कण्हत ? की, गाणं म्हणत ? हा माणसांना पडणारा सनातन सवाल वारकऱ्यांच्या वाऱ्यालाही उभा रहात नाही. किती निर्विष नि मोकळ्या कंठांचं हे जगणं ! श्रद्धेपोटी अनेक योजनं वाट चालता चालता पायांना टचटचून येईनात का फोड, पण रात्रंदिवस वाटा तुडवून वेळापूरच्या उतारावर पंढरीनाथांच्या मंदिराच्या कळसाचं दर्शन होताच, त्या सावळ्याच्या अनावर ओढीनं धोतराचा सोगा वर खेचून हाती टाळ -वीणा पेलून धरीत धावा सुसाट पार करायचा... चंद्रभागेच्या पाण्यात सुस्नात व्हायचं नि विठ्ठल- रखुमाईच्या आशिर्वादासाठी मंदिरासमोर लागलेल्या लांबलचक रांगेत 'पुंडलिक वरदा हाSSSरी विठ्ठल' चा गजर करीत तल्लीन होऊन तासन्तास उभं ठाकायचं... दिंडी पताकांच्या चैतन्यानं भारलेल्या सहवासात नि मृदंगाच्या तालावर वाटेनं नाचत आलेले पाय आपसूकच त्या रांगेत दुखणं विसरुन जातात. तहानभुकेची आठवणही होत नाही. मनीं एकच आस. एवढं कित्येक कोसांवरुन चालत आलो...उन्हा-पावसाची तमा बाळगली नाही. पाय बोलू लागलेत...सूजही आलीय्...केव्हा तुझ्या रुपाच्या दर्शनानं डोळे निवतील...

सकल विश्वकल्याणाचा विचार ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितला. त्यांच्या 'सोनियाच्या पिंपळा' ला आज कितीतरी वटवाघळं लटकू लागलेली दिसत असताना, चहूबाजूंनी अंधार उधळत येणाऱ्या वाटांवर उमललेली उजेडाची दास्तान म्हणजे ही वारी !' जो गरिबीमध्ये सुखी आहे... भुकेला असतानाही शांत आहे... दुःखामध्ये जो आनंदी दिसतो आणि आपल्या शत्रूलाही मित्र मानतो, तो खरा माणूस..' असं अजमेरचे सूफी संत ख्वाजा मोईनोद्दिन चिश्ती म्हणत असत. त्यांच्या या उपदेशात मला आपले मराठमोळे वारकरी दिसतात... त्या जगजेठीपुढं हात जोडण्यासाठी निघालेले. मनांत ज्ञानोबा माऊली, एकनाथ, तुकोबाराय, गोरोबाकाका, सावता माळी, चोखा मेळा, विनोबांचे धावा... महाभारतातील एका काण्डात यक्षानं धर्मराजाला केलेल्या 'का दिक्' या प्रश्नाच्या उत्तरात धर्मराज जसे म्हणतो... 'सन्तो दिक्' ...तसे दूरदूरवरुन आलेल्या वैष्णवांच्या या मेळ्याच्या ध्यानीमनी संतच ! दुःखाच्या भूमीतून सुखाचं पीक काढणारी आनंदयात्रा म्हणजे ही वारी !!



# मराठी सिनेमातील नवा चेहरा : मयूर सुदेश भाटकर



आशिष निनगुरकर
मोबा. 9022879904

आधुनिक केसरी

**मराठी सिनेमांमध्ये वेगवेगळे प्रयोग होत असतात. मराठी सिनेमांचे स्वरूप बदलत आहे. सिनेमा व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी होत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मराठीमध्ये कलाकार, दिग्दर्शक व तंत्रज्ञ यांची एक नवी फळी तयार होतांना दिसते आहे. यातच आता भर पडते आहे आगामी 'मावशी' या सिनेमाची. या सिनेमातून मयूर सुदेश भाटकर नावाचा नव्या दमाचा अभिनेता प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात तो महत्वाची भूमिका साकारतोय.**



मयूर हा मुळचा कोकणातील देवरुख (ता. संगमेश्वर) या गावचा. गेल्या दहा वर्षांपासून साधारण १५ ते १६ व्यावसायिक नाटके आणि विविध २० ते २२ चित्रपटांमधून त्याने छोट्या-छोट्या भूमिका सादर करून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. अभिनेता म्हणून कारकीर्द सुरु करतांना व इतर अभिनेत्यांचा जवळून अभिनय बघतांना त्याला अभिनयाचे वेड स्वस्थ बसू देत नव्हते. ज्या सिनेमासाठी तो सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करायचा, त्या सिनेमातील अभिनयाच्या दृष्टीने त्याने अभ्यास सुरु केला. अनेक दिग्गज अभिनेत्यांसोबत काम केल्याने त्याला खूप काही शिकायला मिळाले.

अनेक सिनेमांमधून त्याच्या छोट्या भूमिका देखील लक्षणीय ठरल्या. प्रत्येक भूमिकेतून त्याला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. प्रत्येक भूमिकेतून त्याने स्वतःची एक वेगळी छाप पाडणारा हा मनस्वी अभिनेता आहे. प्रामाणिकपणे कार्यरत राहणारा आणि अभिनयाबरोबरच माणुसकी जपणारा असा हा उत्तम कलावंत आहे. सध्या गाजत असलेल्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या चित्रपटात मयूर हा 'हंबीरराव' यांची भूमिका भारदस्तपणे सादर करत आहे व उपस्थित रसिकांची दाद त्याला मोठ्या प्रमाणावर मिळत आहे.

आगामी बहुचर्चित 'मावशी' या सिनेमासाठी दिग्दर्शक अजित साबळे नव्या चेहऱ्याच्या शोधात होते आणि त्यांना मयूरच्या निमित्ताने हा नवा चेहरा मिळाला. दिसायला अत्यंत देखणा व रुबाबदार असणारा हा अभिनेता मनाने तितकाच कोमल आहे. लहानपणापासून सिनेमाचा प्रचंड चाहता असलेला मयूर हा अभिनयाचा सर्वोच्च कळस गाठेल असा विश्वास वाटतो.

लवकरच प्रदर्शित होत असलेल्या 'मावशी' व 'फुफाटा' या सिनेमाबरोबरच तो आणखी इतर अनेक सिनेमांमध्ये देखील बिझी आहे. मराठीतील या नव्या चेहऱ्याचे प्रेक्षक छान स्वागत करतील यात शंका नाही. त्याला पुढील प्रवासाला शुभेच्छा...

# अरुण बक्षी यांनी "४८ कोस" या हिंदी चित्रपटात अभिनेता, गायक आणि संगीतकार म्हणून काम केले

आधुनिक केसरी न्यूज



**रमाकांत मुंडे**

**मुंबई :** अरुण बक्षी जे पंकज बेरी सोबत चित्रपटाच्या गाणे आणि ट्रेलर लाँचला उपस्थित होते, अरुण बक्षी हे केवळ एक उत्तम अभिनेतेच नाहीत तर ते एक उत्तम संगीतकार आणि गायक देखील आहेत. त्याने अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्ये हिट गाणी दिली आहेत. आसमान को धरती पे लेने वाला चाहिये सारख्या गाण्यांसाठी प्रसिद्ध असलेला अरुण बक्षी आता 48 कोस या चित्रपटात केवळ अभिनेताच नाही तर संगीतकार आणि गायक म्हणूनही दिसणार आहे.

लेखक, निर्माता, दिग्दर्शक राजिंदर वर्मा यांचा 'यशबाबू' हा ४८ कोस हा हिंदी चित्रपट ८ जुलै रोजी प्रदर्शित होत आहे. यश बाबूच्या "48 कोस" या हिंदी चित्रपटाचे गाणे आणि ट्रेलर मुंबईत लाँच झाला तेव्हा अरुण बक्षी, पंकज बेरी, राजेश बब्बर हे देखील उपस्थित होते. चित्रपटाचा ट्रेलर खूपच दमदार आहे आणि हे गाणे अरुण बक्षी यांनी संगीतबद्ध आणि गायले आहे, ज्यामध्ये त्यांचा अभिनय देखील पाहण्यासारखा आहे.

विशेष बाब म्हणजे अरुण बक्षी त्यांचे प्रत्येक गाणे लता मंगेशकर यांच्या स्टुडिओत रेकॉर्ड करतात. जिथे दर्जाही मिळतो आणि आशीर्वाद ही मिळतो. अरुण बक्षी यांची एक छोटी म्युझिक टीम आहे, त्यांचे म्युझिक प्रोग्रॅमर दिनेश रहाटे यांनी त्यांना या गाण्यात मदत केली आहे.

यशबाबू सांगतात की, आपल्या साहित्यात अशी अनेक व्यक्तिरेखा आणि पात्रे आहेत, ज्यांना आपली तरुण पिढी विसरली असेल. आपल्या इतिहासाच्या गर्भात अशा अनेक कथा आहेत ज्या आजही अकथित आहेत, प्रासंगिक आहेत.

'४८ कोस' या हिंदी फीचर फिल्मद्वारे कुरुक्षेत्राचे नाव जागतिक पटलावर नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. राजिंदर वर्मा यांनी कथेच्या संदर्भात सांगितले की, लहान पणापासूनच त्यांच्यावर महाभारताचा प्रभाव होता. त्याला ४८ कोस यक्षांच्या द्वारपालांच्या कथा अतिशय आकर्षक वाटल्या. त्याला या कथा आधुनिक रूपात रसिकांसमोर मांडायच्या होत्या. कथा फॉर्मात यायला दीड वर्ष लागले.

हा फीचर फिल्म प्रेक्षकांच्या हृदयाला भिडून त्यांना विचार करायला लावेल, असे अरुण बक्षी सांगतात. प्रसिद्ध अभिनेते पंकज बेरी, अनिल धवन, अरुण बक्षी, सोहित सोनी, अनिल वर्मा, जागृती ठाकूर, नलिनी खत्री, योगिता पॉल, याशिवाय बालकलाकार आरव वाधवा, गरवीत खुराना, रितिका राय, जय रल्हान यांनी या चित्रपटात विशेष काम केले आहे. यशबाबू एंटरटेनमेंट निर्मित, '48 कोस' 8 जुलै रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होत आहे.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार







- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

मनोजवं मारुततुल्यवेगमं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।




श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# भोकरला नूतन शाळेच्या मुख्याध्यापकास नोटीस

## गटशिक्षण अधिकारी वाघमारे यांनी दिलेली माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील केंद्रीय प्राथमिक नुतन शाळेत शैक्षणिक सुविधा अभावी विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरसोय होत आहे. शाळा खोल्या असताना व्हरांड्यात बसवून ज्ञानार्जन करण्याची वेळ आली आहे. याबाबत बूधवारी (ता.सहा) सविस्तर बातमी प्रसिद्ध होताच. बातमीची दखल घेऊन मुख्याध्यापकास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे आहे, अशी माहिती गटशिक्षण अधिकारी माधव वाघमारे यांनी दिली आहे.

तालुक्यात मागील अनेक वर्षांपासून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी फारसे प्रयत्न केले नसल्याचे दिसून येत आहे. खासगी शाळेत मात्र गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले जात असल्याने निकालात "नंबर वन" आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्व सामान्य, गोरगरीब, आर्थिक परिस्थिती हालाखीची असलेले विद्यार्थी नाईलाजाने शिक्षण घेतात अशा विद्यार्थ्यांना घडविणे हे जिकिरीचे काम असते त्यामुळे गुणवत्ता दिसून येते नाही. बहुतांश शिक्षक आणि अधिकारी हे नांदेडहून "अपडाऊन" करतात. याशिवाय तालुक्यात बहुतांशी शाळेत शिक्षकाची कमतरता आहे. संबधीत अधिकाऱ्यांनी शाळेला भेटी देऊन मुलांची चाचणी घेतली तर खरे गुपीत उघडकीस येईल.

### मुख्याध्यापकास नोटीस

शहरातील केंद्रीय प्राथमिक नूतन शाळेत आवश्यक सुविधा अभावी विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरसोय होत आहे. प्रामुख्याने शाळेला इमारत असून देखील काही खोल्यात पावसाचे पाणी टपकते आहे. उघड्यावर लघुशंका केल्याने परिसरात दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात आले आहे.

**शहरातील नुतन शाळा संदर्भात बातमी प्रसिद्ध होताच मी स्वता: शाळेला भेट देऊन पाहणी केली. ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यावर त्वरित उपाय योजना करून होणारी गैरसोय दूर करावी अशी सूचना मुख्याध्यापकास केली आहे नव्हे तर कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यावर काही सुधारणा नाही झाल्यास पुढील कार्यवाही केली जाईल.**

**माधव वाघमारे, गटशिक्षणाधिकारी भोकर**

मुख्याध्यापकास वारंवार माहिती देऊन ही कानाडोळा करीत असल्याने शिक्षकांनी चक्क व्हरंड्यात बसून मुलांना शिक्षण देणे पसंत केले आहे.

याबाबत बुधवारी बातमी प्रसिद्ध करतात. बातमीची दखल घेऊन गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित मुख्याध्यापकास कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याने मुख्याध्यापक आणि कामाला लागल्याचे समजते.

# आयुष्यभर कबड्डीला श्वास समजून तिच्यावर नितांत प्रेम करणाऱ्या हाडामासाच्या खेळाडूचा उशीरा का होईना झाला सन्मान

## प्रा.दगडू चव्हाणांचे आयुष्याच्या उत्तरार्धात अभिनंदन-कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर कळायला लागलेल्या वयापासून ते आजतागायत म्हणजे जवळपास 50 वर्षांपासून कबड्डी खेळावर जीवापाड नितांत प्रेम करणारे नव्हे कबड्डीला आपला आत्मा-श्वास समजून या खेळासाठी आपले अख्खे जीवन समर्पित करणारे राष्ट्रीय खेळाडू प्रा.दगडू चव्हाण यांचा उशिरा का होईना सन्मान होतोय हीच आम्हा अंबाजोगाईकरांसाठी अभिमानाची




बाब आसल्याची उपहासात्मक खोचक प्रतिक्रिया काही खेळाडूंनी आमच्याशी बोलताना दिल्याने त्याची सरकार व कबड्डी राज्य असोसिएशन बाबतीतची नाराजी स्पष्ट दिसून येते.

15 जुलै रोजी 22 व्या कब्बडी दिनानिमित्य बीड जिल्ह्याची आणि कबड्डी क्षेत्रातील आण-बाण-शान, जिल्ह्यातील एकेकाळीचे नामांकित कब्बडीपटू राष्ट्रीय खेळाडू प्रा.दगडू चव्हाण यांना महाराष्ट्र राज्य कब्बडी असोसिएशनच्या वतीने "राज्यस्तरीय जेष्ट कार्यकर्ता" पुरस्काराने बालेवाडी, पुणे येथे सन्मानित केले जाणार असून त्यांचे या पुरस्काराबद्दल कबड्डी प्रेमी खेळाडू-नागरिकांसह जिल्हाभरातून अभिनंदन केले जात आहे.

### अंबानगरीकर आणि येथील राजकीय मंडळींच्या वतीने भुमीपुत्राचा गौरव-सन्मान होणार का?

बालपणापासून ते आयुष्याच्या शेवटच्या पर्वापर्यंत गर्व वाटण्या इतपत कबड्डी खेळाला व अंबाजोगाई तथा अंबानगरीला राष्ट्रीय स्तरावर नेऊन नाव उंचावणाऱ्या भुमीपुत्राचा येथोचित गौरव-सन्मान अंबाजोगाईकर आणि येथील राजकीय नेतगण मंडळी करणार का? असाही प्रश्न यानिमित्ताने चर्चिला जात आहे.

# पोलिसांची ड्युटी आठ तास करावी यासाठी पोलीस अधीक्षक यांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली संतोष चौधरी संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष यांच्या आदेशानुसार गजानन भगत राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख व सुनिल पाटील यांच्या सुचनेनुसार जिल्हाप्रमुख अशोक वरकड पाटील यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद जिल्हा यांच्या वतीने पोलीसांच्या आठ तासांच्या डुयुटी व इतर मागण्यांसंदर्भात मनिष कलवानिया पोलीस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख अशोक वरकड पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष



योगेश निकम, युवा जिल्हा अध्यक्ष तेजस आरखडे, शहर पुर्व तालुका प्रमुख कैलास बनकर, वैजापूर तालुका प्रमुख मजनू पठाण, बंडू पांचाळ बनकर, राजेंद्र बनसोडे, राजु थोरात, मंगल गाजकर, कावेरी बनसोडे, सविता भोकरे, संगिता शेळके आदी कार्यकर्ते व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# सचिन अत्री यांची क्रीडा आघाडी शहर संयोजक म्हणून निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय जनता पार्टी शहर जिल्हा, जिल्हा कार्यकारणीमध्ये आपणांस क्रिडा आघाडी शहर संयोजक म्हणून सचिन सुभाष अत्री यांची निवड करण्यात आली आहे, असे संजय केणेकर यांनी सांगीतले.

भारतीय जनता पार्टीच्या शहरात पक्षबळकटीसाठी व मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येय धोरणे सर्व सामाण्यांपर्यंत पोहचविण्यासाठी आपण प्रयत्न कराल असा मला विश्वास आहे. जगातल्या सगळ्यात मोठ्या पक्षाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी आपणास मिळत आहे. या जबाबदारीचे स्मरण कायम राहील, अशी अपेक्षा भारतीय जनता पार्टीचे संजय केणेकर यांनी व्यक्त केली.





# दुसाने गावातील दहशत करणाऱ्यास ठोकल्या बेड्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री तालुक्यातील दुसाने गावातील रामेश्वर लोटन वाघ यांनी दहशत माजविण्याच्या उद्देशाने त्याच्या घरात तलवार व चाकू बाळगून असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार हेमंत पाटील स्थानिक गुन्हे शाखा यांनी पथक तयार करून सदर इसमाचा शोध घेऊन पुढील कारवाईचे निर्देश प्राप्त झाले. मौजे दुसाने तालुका साक्री जिल्हा धुळे तो त्याच्या घरात आढळून आला व त्यास ताब्यात घेऊन विश्वासात घेतल्याने त्याने त्याच्या घरातील लाकडी पलंगाच्या खाली लपविलेले चाकू व तलवार मिळून आल्याने त्याला अटक करण्यात आली.

सदर व्यक्तीकडे 2,000 रु.किंमतीची एक लोखंडी धातुची चमकदार वक्राकार आकाराची पुढील बाजुस टोकदार व मागील बाजुस पितळी रंगाची मुठ असलेली व लांबी 33 इंच व रुंदी 1.5 इंच पात्याची धारदार तलवार व म्यान 500 रु. किंमतीचा एक लोखंडी धातुचा चमकदार सरळ आकाराचा पुढील बाजुस टोकदार व मागील बाजुस पितळी मुठ असलेला व लांबी 9 इंच व रुंदी 2 इंच पात्याचा धारदार चाकु असे आहे. तलवार व चाकु रामेश्वर लोटन वाघ याचे कब्जात मिळुन आल्याने जप्त करण्यात आले असून सदर आरोपीविरुध्द निजामपूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई प्रविणकुमार पाटील पोलीस अधीक्षक धुळे, प्रशांत बच्छाव अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली हेमंत प्र.पाटील पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा धुळे, सपोनि. प्रकाश पाटील, धनंजय मोरे, संजय पाटील, संतोष हिरे, पंकज खैरमोरे, महेंद्र सपकाळ, योगेश जगताप, किशोर पाटील, सागर शिर्के व कैलास महाजन यांनी केली आहे.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद

समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.

संस्थेचे उद्देश

माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम


सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष


रविंद्र बनकर
उपाध्यक्ष


अपर्णा मेहता
सचिव

अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# मराठवाड्यातील चार मीटर रीडिंग एजन्सीज तडकाफडकी बडतर्फ

## अधीक्षक अभियंत्यासह कार्यकारी अभियंत्यास कारणे दाखवा नोटीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उत्कृष्ट ग्राहकसेवा व महसूल यासाठी महावितरणचे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत वीजमीटरचे रीडिंग अचूकच झाले पाहिजे. मीटरच्या रीडिंगमधील अचूकतेसाठी महावितरणने अतिशय गांभीर्याने धडक उपाययोजना सुरू केल्या आहेत. चुकीच्या वीजबिलांमुळे ग्राहकांना होणारा नाहक मनस्ताप व बिल दुरुस्तीच्या त्रासासोबतच महावितरणच्या महसूलाचे नुकसान अजिबात सहन केले जाणार नाही. मीटर रीडिंगमध्ये हयगय करणाऱ्या मीटर रीडिंग एजन्सीविरुद्ध तसेच महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल असा इशारा महावितरणचे संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांनी गुरुवारी (७ जुलै) औरंगाबाद येथे झालेल्या मीटर रिडींग एजन्सीचे संचालक व प्रतिनिधींच्या बैठकीत दिला.

दरम्यान, गेल्या दोन महिन्यांपासून अचूक रीडिंगसाठी सुधारणा न करणे, वीजमीटर योग्य स्थितीत असूनही हेतुपुरस्सरपणे नादुरुस्तीचा (फॉल्टी) शेरा देणे, सरासरी किंवा चुकीचे रीडिंग घेणे आदी प्रकार दिसून आल्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील दोन, बीड व हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येकी एक अशा चार मीटर रीडिंग एजन्सीजना या बैठकीतच तडकाफडकी बडतर्फ करण्यात आले. तसेच महावितरणच्या एका अधीक्षक अभियंत्यासह कार्यकारी अभियंत्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

औरंगाबाद परिक्षेत्राअंतर्गत सर्व मीटर रीडिंग एजन्सीजचे संचालक व प्रतिनिधींची बैठक झाली. यावेळी संचालक (संचालन) संजय ताकसांडे, सहव्यवस्थापकीय संचालक




डॉ.मंगेश गोंदावले, कार्यकारी संचालक (देयके व महसूल) योगेश गडकरी, मुख्य अभियंता संजय पाटील (देयके व महसूल), नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर, लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, औरंगाबाद परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता प्रकाश जमधडे उपस्थित होते. या बैठकीत एका सादरीकरणाद्वारे एजन्सीकडून होणाऱ्या फोटो मीटर रीडिंगमधील चुका, सदोष रीडिंग, मीटर नादुरुस्तीबाबत चुकीचे शेरे आदींची माहिती देऊन त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत एजन्सीजच्या संचालकांना उपाय सांगण्यात आले.

संचालक (संचालन) संजय ताकसांडे म्हणाले की, मीटर रीडिंग हा बिलींगचा मुख्य आधार आहे. त्यात १०० टक्के अचूकता पाहिजेच. परंतु चुकीचे किंवा सदोष रीडिंग घेतल्यास महावितरणच्या महसूलाचे नुकसान आणि ग्राहकांना वीजबिल दुरुस्तीचा नाहक त्रास होतो ही बाब अजिबात खपवून घेतली जाणार नाही. मीटर रीडिंग एजन्सीजविरुद्ध केवळ कारवाई करणे हा मुख्य उद्देश नाही. परंतु रीडिंगसाठी जे अचूकतेचे, गुणवत्तेचे मापदंड आहेत त्यात कुचराई झाल्यास एजन्सीज व महावितरणच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाईल.

अचूक मीटर रीडिंगबाबत उपविभाग व विभाग कार्यालयांनी दैनंदिन आढावा घ्यावा. दैनंदिन पर्यवेक्षण करावे. बिलिंग किंवा रीडिंगमध्ये कोणतीही अनियमितता आढळल्यास ताबडतोब उपाय करावेत व ग्राहकांना अचूक बिल देण्यात येईल याची काळजी घ्यावी. सोबतच मीटर रीडर नियुक्त करताना त्यांची शैक्षणिक पात्रता, तांत्रिक प्रशिक्षण, संवाद कौशल्य, गुणवत्ता इत्यादी बाबी संबंधित अधिकाऱ्यांनी एजन्सीजकडून तपासून घ्याव्यात असे निर्देश यावेळी संचालक ताकसांडे यांनी दिले.

महावितरणकडून प्रामुख्याने उत्कृष्ट ग्राहकसेवा व महसूलवाढीसह सक्षमतेचा, प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी आमुलाग्र सुधारणा सुरु आहेत. त्यात कोणतीही तडजोड होणार नाही. ग्राहकांनी प्रत्यक्षात वापरलेल्या विजेचे अचूक बिल देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. परंतु सदोष व चुकीच्या रीडिंगमुळे ग्राहकांचा रोष वाढतो. त्यामुळे अचूक बिलींगसाठी १०० टक्के अचूक रीडिंग हे महावितरणचे लक्ष्य आहे. त्यासाठी सुरु असलेल्या उपायांमुळे गेल्या दोन महिन्यांमध्ये बिलिंग व रीडिंगमध्ये मोठी सुधारणा झाली आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण कमी झाले आहे. मीटर रीडिंग हे अचूक व गुणवत्तेनुसार होईल यासाठी कायम काळजी घेण्यात येईल. तसेच वारंवार सूचना देऊनही एजन्सीजने रीडिंगमधील हेतुपुरस्सर चुका किंवा सततचे दोष टाळले नाहीत तर एजन्सीजविरुद्ध बडतर्फी व काळ्या यादीत टाकण्यासह प्रसंगी फौजदारी कारवाई केली जाईल असे संचालक (संचालन) संजय ताकसांडे यांनी स्पष्ट केले.

यावेळी सहव्यवस्थाकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांत बिलिंग व मीटर रीडिंगमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत. तथापि, या कामास वेग देणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक वापरलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटची वसुली झाले पाहिजे, याकडे महावितरणच्या अभियंते-कर्मचाऱ्यांनी कटाक्षाने लक्ष द्यायला हवे.



# ओबीसी आरक्षण मिळेपर्यंत संघर्ष करणार : आयलवाड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्यातील ओबीसी समाजाची टक्केवारी सर्वाधिक आहे. राजकीय मंडळी केवळ मतापुरते वापर करून आपल्या न्यायहक्काच्या मागण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. अनेकदा शासन दरबारी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा उपस्थित केला पण न्याय मिळाला नाही. आरक्षणासाठी न्याय मिळेलपर्यंत आमचा संघर्ष सुरू राहील, असे प्रतिपादन गोल्ला गोल्लावार समाजाचे प्रांत अध्यक्ष नामदेव आयलवाड यांनी गुरुवारी (ता.सात) केले आहे.

भोकर-उमरी रस्त्यावर असलेल्या संपर्क कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती गोविंद बाबा गौड पाटील, सभापती जगदीश पाटील भोसीकर, रामचंद्र मुसळे, पत्रकार बी.आर.पाचांळ, मनोज गीमेकर, सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव अमृतवाड, भगवान दंडवे, केशव पाटील पोमनाळकर यांची उपस्थिती होती. बैठकीत आयलवाड यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

आयलवाड म्हणाले की, मी कोणत्याही पक्षात असो ओबीसी समाजाला न्याय देण्यासाठी माझा लढा अविरतपणे सुरू राहणार आहे. लोकानी मला कितीही हिणवले तरी माझे ध्येय मी तुसभरही ढळू देणार नाही. आता काँग्रेस पक्षात स्थिरावलो आहे. भविष्यात ही याच पक्षात निष्ठेने काम करणार आहे.

यापुर्वी अनेकदा आरक्षणाच्या मुद्द्यावर आम्ही शासनदरबारी पाठपुरावा केला नव्हे तर मोर्चे, आंदोलन करून सरकारला जाब विचारला आहे. पण मतलबी राजकीय पुढारी आजपर्यंत आमच्या समाजाचे केवळ आसवे पुसण्यात धन्यता मानली आहे. त्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होतो आहे. यापुर्वी सत्तेत असलेल्या आणि आता सत्तेत असलेल्यांनी आरक्षणाच्या बाबतीत कोणताही ठोस निर्णय घेतला नाही. आताची राजकीय परिस्थिती पाहता ओबीसी आरक्षणाचा मुद्दा निकाली निघण्याची शक्यता आहे. जर न्याय मिळाला नाही तर आमचा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा नामदेव आयलवाड यांनी दिला आहे.

# औरंगाबाद जिल्हाध्यक्षपदी संदीप मानकर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** तालुक्यातील अनाड येथील रहिवाशी असलेले व आपल्या निर्भीड शैलीतून समाजाला व सर्वसामान्यांना उचित न्याय देणारे सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संदीप दादाराव मानकर यांची राज्यव्यापी असलेल्या मातंग एकता आंदोलन या सामाजिक संघटनेच्या औरंगाबाद जिल्हाध्यक्ष पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

मातंग एकता आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री रमेश बागवे, राज्य कार्याध्यक्ष तथा पुणे महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक अविनाश बागवे, जिल्हा नियोजन समितीचे राजू आहिरे यांचे हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

याप्रसंगी राज्य सहसचिव चंद्रकांत काळोखे, राज्य समन्वयक विठ्ठल थोरात, रमेश सकट, अशोक कांबळे, सखाराम आहिरे आदी पदाधिकाऱ्यांसहित औरंगाबाद शहर व ग्रामीण मधील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते समाजबांधव व भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यांसोबतच अशोक पाचुंदे यांची राज्य सचिव पदी, अशोक शिरसाठ यांची जिल्हा सचिव पदी, किशोर तुपे यांची शहराध्यक्ष पदी, राजश्री साठे यांची महिला आघाडी जिल्हाध्यक्षा पदी निवड करण्यात आली. उपस्थित सर्वांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या..!!





# घरफोडीतील आरोपीकडून ६ तोळे सोने जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर येथे घरफोडी करून सोन्याचे दागिने घेऊन पसार झालेल्या चोरट्याच्या शिरपूर शहर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईत या चोरट्याकडे असलेले चोरीचे जवळपास सहा तोळे सोने ज्याची बाजारामध्ये जवळपास तीन लाखांहून अधिकची किंमत मानली जात आहे.

मध्य प्रदेश येथील चोरट्याने काही दिवसांपूर्वी शिरपूर येथून घरपोडी करून फरार होता. त्यानंतर हा चोरटा शिरपूर येथील चोपडा फाट्याजवळ असल्याची गुप्त माहितीद्वारा मार्फत शिरपूर शहर पोलीस अधिकाऱ्यांना माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी अत्यंत शिताफीने या चोरट्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी त्याच्याकडे असलेले जवळपास सहा तोळे सोने हस्तगत केले असून पुढील कारवाई शिरपूर पोलीस करीत आहेत.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# केरोळी फाटा येथे गोर सेनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन

## दोन तास वाहतूक ठप्प, प्रवाशांची उडाली तारांबळ

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** तालुक्यातील मौजे गुंडवळ येथील ग्रा.पं.कार्यालयावर कार्यरत असलेले ग्रामसेवक अशोक विठ्ठल पंदिलवाड व सरपंच उत्तम माधवराव खंदारे यांनी शासनाच्या निर्णयाची पायमल्ली करून दि.१ जुलै २०२२ रोजी जगभरातील अनेकांचे प्रेरणास्थान हरीत क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन जाणूनबुजून टाळाटाळ करत ग्रामपंचायत कार्यालयात न करता परस्पर ग्रामपंचायत कार्यालय बंद ठेवले. त्यामुळे वंसतराव नाईक प्रेमी जनतेच्या धार्मिक भावना दुखावल्याने सरपंच व ग्रामसेवक यांचे विरुद्ध तात्काळ फौजदारी कारवाई करण्याच्या मागणीसाठी गोर सेना शाखा माहूर च्या वतीने केरोळी फाटा येथे आज सकाळी 11 वाजता रास्ता रोको आंदोनल करण्यात आले. यावेळी दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.



दि.१ जुलै २०२२ रोजी बंजारा समाजासह जगभरातील अनेकांचे प्रेरणास्थान हरीत क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन असल्याची जाणीव असतांना सुद्धा महाराष्ट्रामध्ये संपूर्ण सरकारी कार्यालायामध्ये शासन निर्णयानुसार जयंती उत्सव चांगल्या पद्धतीने साजरा केला. परंतु शासन निर्णयाचे उल्लंघन करत मौजे गुंडवळ येथील ग्रामपंचायत कार्यालयावर ग्रामसेवक व सरपंच यांना माहिती असतांना सुद्धा त्यांनी जाणीवपूर्वक त्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालयच उघडले नाही व जाणीवपूर्वक बाहेरगावी जाऊन ग्रामसेवक व सरपंच यांनी आपला मोबाईल बंद ठेवला असल्यासाचा आरोप करण्यात आला होता. शासन निर्णयाची पायमल्ली केल्याने तात्काळ सरपंच व ग्रामसेवक यांच्या विरुध्द निलंबनासह फौजदारी कार्यवाही करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

गोर सेनेचे तालुकाध्यक्ष प्रफुल जाधव यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांनी या रस्ता रोको आंदोलनात सहभाग नोंदवला.

सदरील आंदोलन कर्त्यांचे गटविकास अधिकारी कांबळे व महसूल चे मंडळ अधिकारी पडकोंडे यांनी निवेदन स्वीकारून तीन दिवसात संबंधित ग्रामसेवक व सरपंचांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. गटविकास अधिकारी आंदोलनस्थळी एक तास उशिराने आल्याने वाहतूक ठप्प झाली. त्यामुळे विदर्भ व मराठवाड्याला जोडणाऱ्या केरोळी फाटा दरम्यानच्या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांची तारांबळ उडाली होती.

यावेळी गोर सेनेचे तालुकाध्यक्ष प्रफुल जाधव, उपाध्यक्ष उकंडदास पवार, सचिव प्रल्हाद राठोड, प्रा.मधूसिंग जाधव, यादव आडे, संदीप राठोड, विष्णू कारभारी, प्रल्हाद कारभारी, अरविंद राठोड, प्रदीप पवार, गुंडवळ शाखाध्यक्ष विठ्ठल राठोड, विशाल राठोड आदी पदाधिकारी याचेंसह बंजारा समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी माहूर पोलीस स्टेशन चे सहा.पो. निरीक्षक अण्णासाहेब पवार, संजय पवार, बिट जमादार विजय आडे, पोहेकॉ प्रकाश देशमुख, सुशील राठोड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# नियमित कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना नवनियुक्त सरकारचा दणका

## महाविकास आघाडी सरकारने घेतलेला निर्णय रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** परिसरात राज्याच्या सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडी सरकारने महात्मा फुले पिक कर्जमाफी देण्यासोबतच नियमित पिक कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचे जाहीर केले होते. दरम्यान राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी १ जुलै २०२२ पासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याच्या निर्णयाला नवनियुक्त सरकारने कात्री लावल्याने शेतकऱ्यांवर हा मोठा आघात असल्याचे बोलल्या जाऊ लागले आहे. राज्याच्या सत्तेत आलेल्या तत्कालीन फडणविस सरकारने शेतकऱ्यांना दिड लाखापर्यंत पिक कर्ज माफी तर नियमित पिक कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना २५ हजार रुपये सानुग्राह अनुदान देण्याचे जाहीर केले होते. मात्र अनेक शेतकरी लावण्यात आलेल्या अर्टिमुळे तत्कालीन स्थितीत अपात्र ठरल्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी पिक कर्जातून मुक्त होण्यापासुन वंचित राहिले होते.

ही गंभीर बाब राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महात्मा फुले पिक कर्जमाफी योजने अंतर्गत दिड लाखावरुन दोन लाखांवर वाढविण्यासह नियमित पिक कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाप्रती असंतोष खदखदत असल्याचे तशे पाहू जाता २५ हजाराहून ५० हजार रुपये सानुग्राह अनुदान देण्याचे जाहीर केले होते. दरम्यान २२ मार्च २०२० च्या मध्यरात्रीपासून राज्यात कोरोना महामारीमुळे लॉंकडाऊन लावण्यात आल्याने व राज्य सरकारचे उत्पन्नाचे स्त्रोत घटल्याचे सबब पुढे करून सदर प्रोत्साहन अनुदान योजना वेट अँड वॉंचवर ठेवण्यात आली होती. मात्र राज्याच्या विधानमंडळाने नुकतेच एकमताने निर्णय घेऊन राज्यातील नियमित पिक कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना १ जुलै २०२२ पासून सानुग्राह अनुदान थेट बँक खात्यात जमा करण्याचे जाहीर करण्यात आल्याने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण पसरले होते. मात्र राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होऊन नुकतेच सत्तेत आलेल्या शिंदे सरकारने नियमित पिक कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये सानुग्राह अनुदान देण्याचा निर्णयाला कात्री लावण्यात आली असल्याची माहिती संग्राम देशमुख यांनी ट्विट करून दिली असल्याने शेतकऱ्यांत चांगलीच खळबळ माजली आहे.

### सत्तेत साठमारीत शेतकऱ्यांचे मरण



**महाविकास आघाडी सरकारवर संकटाचे ढग गडद झाल्यानंतर शेवटच्या काही दिवसात भाराभर परीपत्रक काढण्यात आले होते. यामध्ये शेतकऱ्यांना ५० हजार रुपये सानुग्राह अनुदानाही समावेश होता, मात्र महाविकास आघाडी सरकार गडबडले आणि शिंदे सरकार स्थापन झाले. या सरकारने जुन्या सरकारचे निर्णय रद्द करण्याचा सपाटा लावला असल्याने सत्तेच्या साठमारीत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे मरण होत आहे.**

**प्रा.मदनभाऊ डोखळे**
**(सामाजिक कार्यकर्ते) डाभा तालुका सोयगाव**

# विजेची तार ओढताना कन्नड तालुक्यात चौघांचा जागीच मृत्यू



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पोटाची खळगी भागवण्यासाठी वीज तार ओढण्याचे काम करताना तार वीज प्रवाह असलेल्या वायरवर पडल्याने शॉक लागून चौघांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना कन्नड तालुक्यातील हिवरखेडा नांदगीर वाडी येथे शुक्रवारी अडीच वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, हिवरखेडा नांदगीर वाडी येथे नवीन विद्युत प्रवाहाचे काम करत होते. विद्युत पोल उभे केले होते. त्या पोलवर नवीन तार ओढण्याचे काम चालु होते. ज्या ठिकाणी हे तार ओढण्याचे काम सुरू होते तिथे मात्र विद्युत प्रवाह नव्हता. तार ओढत असताना ती तार नेमकी त्या केबलवर वायरवर पडली. तार ओढत असताना ती तार वायरला घासली आणि थ्रिफेजचा संपूर्ण विद्युत प्रवाह त्या तारेत उतरला. थ्रिफेजची फुल लाईट असल्याने या चार जणांचा काही सेकंदात जागीत मुत्यु झाला. यात गणेश कारभारी थेटे (35) भारत बाबुराव वरकड (35) जगदीश मुरकुंडे (40), अर्जुन वाळु मगर (26, सर्व रा. नावडी) असे मृतांची नावे आहेत. नवीन विद्युत प्रवाहाच्या तार ओढण्याचे काम करताना अचानक विद्युत तारेत प्रवाह आल्याने या सर्वांचा मृत्यू झाला. ते कन्नड तालुक्यातील नावडी येथील होते. ही बातमी कळताच गावावर शोककळा पसरली.

### माहिती घेऊन कार्यवाही करु

**काम करण्यापूर्वी आमच्या वायरमन अथवा अभियंत्याला कुठलीच माहिती न देता ते तिथे कामासाठी गेले. आम्ही ज्या ठेकेदाराला काम दिले होते त्या ठेकेदाराची ती माणसे नाहीत. मुख्य ठेकेदाराने कुणाला काम दिले यांची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करु.**

**नितीन गायकवाड, उपकार्यकारी अभियंता, कन्नड**


पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी


आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला



३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत


पुस्तकांवर 20% सूट







गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-




पाने ५३४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568




पाने ३६४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910




# सावळदबारा येथे बकरी ईदनिमित्त दानशूर हाजी मजीद जकेरिया यांच्यातर्फे आदिवासी महिलांना कपडे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे सामाजिक बांधिलकीतून दि.7 रोजी गुरुवार वतीने बकरी ईद सणानिमित्त गरीब, निराधार व आदिवासी महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. दानशूर हाजी मजीद झकेरिया यांच्यातर्फे औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील सावळदबारा सर्कलमधील आदिवासीबहुल भागातील पळसखेड, सावळदबारा व देव्हारी या आदिवासी गावात जाऊन तेथील 140 गरजू आदिवासी महिलांना साडी व कपडे वाटप करण्यात आले. यावेळी इकरा एज्युकेशन सोसायटी संस्थेचे अध्यक्ष हाजी मजीद झकेरिया यांच्या हस्ते आदिवासी गोरगरीब महिलांना साडी व कपडे वाटप करण्यात आले हातावर काम नसल्या गोरगरीब, भुमीहिन अशा गरजू आदिवासी भागात यावेळी दानशूर हाजी मजीद झकेरिया यांचे सहकारी मित्र डॉक्टर मोईन शेख पहुर, अल हिंद हॉस्पिटल चे अध्यक्ष शेख अल्ताफ जळगाव, शेख अजमत जळगाव याच्या हस्ते साडी व कपडे वाटप करण्यात आले. यावेळी सावळदबारा सर्कल मधील पत्रकार रहीम पठाण, गफार तडवी, मनोर तडवी, कादर तडवी, जब्बार तडवी, पळसखेड येथील गुलाब तडवी, आमिर खान तडवी, अफसर तडवी, देव्हारी येथील सरपंच शामिरखा तडवी, सलीम तडवी असे अनेक आदिवासी ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.